www.lokrakshanay.com | epaper.lokrakshanay.com | dainiklokrakshanay@gmail.com | +91 97023 86118

HUMAN RIGHTS
मानवी हक्क
दिनानिमित्त सर्वांना आपल्या अधिकारांबाबतीत जागरूक राहण्याचे व मानवधर्म जोपासण्याचे आवाहन

दैनिक
# लोकरक्षणाय
प्रकाशन ठाणे सह एकाच वेळी प्रसारित - पालघर, मुंबई, पुणे, रायगड, सातारा, कोल्हापूर, नाशिक
लोकशाहीच्या संरक्षणार्थ

सहसंपादक - अनिकेत घनश्याम भंकाळ ■ वर्ष - ०२ ■ अंक १८८ ■ पृष्ठे - ०६ ■ ठाणे, मंगळवार, १० डिसेंबर २०२४ ■ रु. २/- ■ RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118



■ लाडकी बहीण योजनेच्या अर्जांची खरंच छाननी होणार...
पान ६ वर....

## थोडक्यात

### विधान परिषदेच्या सभागृह नेतेपदी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

मुंबई - विधान परिषद सभागृहाचे नेते म्हणून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नावाची घोषणा विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी केली.

### ४ नवनिर्वाचित सदस्यांनी घेतली सदस्यपदाची शपथ

मुंबई - विधानसभेच्या विशेष अधिवेशनात दि. ९ डिसेंबर रोजी ४ नवनिर्वाचित सदस्यांना विधानसभेचे हंगामी अध्यक्ष कालिदास निळकंठ कोळंबकर यांनी सदस्यपदाची शपथ गोपनीयतेची शपथ दिली. शपथ घेतलेल्या सदस्यांमध्ये सर्वश्री जयंत राजाराम पाटील, विनय विलासराव कोरे (सावकार), सुनील शंकरराव शेळके, उत्तम शिवदास जानकर यांचा समावेश आहे. या विशेष अधिवेशनाच्या कालावधीत एकूण २८३ सदस्यांनी सदस्यपदाची शपथ घेतली.

### विधान परिषदेत उपमुख्यमंत्री, नवनिर्वाचित सदस्यांचा परिचय

मुंबई - विधीमंडळाच्या विशेष अधिवेशनात विधान परिषदेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा तसेच नवनिर्वाचित सदस्यांचा सभागृहाला परिचय करून दिला. परिचय करून देण्यात असलेल्या नवनिर्वाचित सदस्यांमध्ये पंकजा मुंडे, योगेश टिळेकर, भावना गवळी, कृपाल तुमाने, शिवाजी गर्जे, मिलिंद नार्वेकर, प्रज्ञा सातव, हेमंत पाटील, पंकज भुजबळ, इद्रिस नाईकवाडी, विक्रांत पाटील, धर्मगुरु बाबुसिंग महाराज राठोड, मनीषा कायंदे, चित्रा वाघ यांचा समावेश होता.

# महाराष्ट्र- कर्नाटक सीमा वाद पेटणार

## एकीकरण समितीच्या मेळाव्याला परवानगी नाकारली

● बेळगाव, सचिन कदम :

**महाराष्ट्र-कर्नाटक सीमा वाद पुन्हा एकदा पेटण्याची शक्यता निर्माण झाली आहे. बेळगावातील वॅक्सिन डेपो मैदानात आज (१०डिसेंबर) महाराष्ट्र एकीकरण समितीचं महाअधिवेशन होणार आहे. कर्नाटक सरकारने महाराष्ट्र एकीकरण समितीच्या महामेळाव्याला परवानगी नाकारली आहे. या अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर कर्नाटक सरकारकडून वॅक्सिन डेपो मैदानातसह आजुबाजूच्या परिसरात सकाळी सात वाजल्यापासून सायंकाळी पाच वाजेपर्यंत संचारबंदी लागू करण्यात आली आहे. याशिवाय डेपो परिसरात मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. त्यामुळे मराठी भाषिकांची ही गळचेपी असल्याचा आरोप मराठी एकीकरण समितिकडून करण्यात आला आहे.**



कर्नाटक सरकारने महामेळाव्याला परवानगी नाकारत मेळाव्याच्या ठिकाणी पोलिसांचा मोठा बंदोबस्त वॅक्सिन डेपो मैदानात तैनात करण्यात आला आहे. मराठी भाषिकांनी जमू नये, यासाठी पोलिसांकडून खबरदारी घेतली जात असताना दुसरीकडे मात्र मराठी भाषिकांनीदेखील मेळाव्याला जाणारं असल्याची ठाम भूमिका घेतली आहे. महाराष्ट्र एकीकरण समितीचे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनीही मेळावा घेण्याची भूमिका घेतल्याने परिसरात तणाव वाढण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

कर्नाटक विधानसभेच्या हिवाळी अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी महाराष्ट्र एकीकरण समितीचा महामेळावा होतो. पण यावर्षी कर्नाटक सरकारने मेळाव्याला परवानगी नाकारली आहे. त्यामुळे कर्नाटक सरकारची दडपशाही सुरू असल्याचा आरोप महाराष्ट्र एकीकरण समितीकडून करण्यात येत आहे. कितीही संचारबंदी आणि पोलीस बंदोबस्त तैनात केला तरी, वॅक्सिन डेपो मैदानात एकत्र जमणार असल्याचा इशारा मराठी भाषिकांनी दिला आहे. त्यासाठी समितीच्या पदाधिकाऱ्यांनी मैदानात येऊन पाहणीदेखील केल्याची माहिती आहे.

पान २ वर



## राज्यसभा अध्यक्षांना हटवण्याची तयारी

### विरोधी पक्ष सादर करणार अविश्वास प्रस्ताव

● नवी दिल्ली, प्रगती शर्मा :

विरोधक राज्यसभेत अध्यक्षांच्या विरोधात अविश्वास प्रस्ताव आणण्याच्या तयारीत आहेत. वृत्तांवर विश्वास ठेवला तर विरोधक या अधिवेशनात हा प्रस्ताव आणू शकतात. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, इंडिया ब्लॉक राज्यसभेचे अध्यक्ष आणि उपाध्यक्ष जगदीप धनखड यांच्या विरोधात अविश्वास प्रस्ताव आणू शकते. सर्व प्रमुख विरोधी पक्षांनी त्यावर स्वाक्षरी केली आहे. ज्यामध्ये टीएमसी, आम आदमी पार्टी आणि सपा यांचा समावेश आहे. जे संविधानाच्या अनुच्छेद ६७(बी) अंतर्गत सादर केले जाईल.

पान २ वर

## कोकण रेल्वेवरील दुहेरीकरणाचे स्वप्न हे स्वप्नच राहणार

● मुंबई, विशाल पाटील :



गेल्या दोन दशकात कोकण रेल्वेवरील प्रवासी संख्या, रेल्वेगाड्या आणि स्थानकाची संख्या वाढली. मात्र कोकण रेल्वेचे दुहेरीकरण प्रलंबित असल्याने, कोकण रेल्वे प्रवाशांचा प्रवास गैरसोयीचा होतो. प्रवाशांचा प्रवास अवेळी होत असल्याने, त्यांच्यातून नाराजीचा सूर कायम उमटत असतो. यासाठी कोकण रेल्वेवर दुहेरीकरण करण्याची चर्चा होत होती. परंतु, कोकण रेल्वे मार्गावर दुहेरीकरणाचा कोणताही प्रस्ताव नसल्याचे माहिती अधिकारातून स्पष्ट झाले आहे. त्यामुळे कोकणवासीयांचे वाढीव रेल्वेगाड्या, धावांचे स्वप्न स्वप्नच राहणार आहे. भारतीय रेल्वेत कोकण रेल्वेचे विलीनीकरण करण्याची मागणी अनेक वर्षांपासून केली जाते. तसेच नुकताच कर्नाटक राज्यातील काही खासदार एकत्र येऊन त्यांनी रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची भेट घेऊन, या विषयाबाबत चर्चा केली. परंतु, अद्याप ठोस निर्णय झाला नाही. तर, दुसरीकडे कोकण विकास समितीचे सदस्य अक्षय महापदी यांनी नुकतात माहिती अधिकाराखाली विचारलेल्या प्रश्नातून धक्कादायक उत्तर मिळाली आहे.

## वक्फ बोर्डविरोधात मनसेची आक्रमक भूमिका

## प्रश्न फक्त जमिनीचा नाही, शेतकऱ्यांवर अन्याय व्हायला नको

● लातूर, सचिन कदम :




लातूरच्या अहमदपूर तालुक्यातील तळेगाव गावातील बातमी धक्कादायक आहे. गावातील एकूण शेतजमीनीपैकी जवळपास ७५% शेतजमिनीवर वक्फ बोर्डाने दावा सांगितला आहे. यामुळे १०३ शेतकऱ्यांचं जगणंच धोक्यात आलं आहे. आम्ही कुठल्याही शेतकऱ्यावर अन्याय होऊ देणार नाही असं जरी राज्य सरकारने सांगितलं असलं तरी हे पुरेसं नाही. प्रश्न हा या जमिनीपुरता नाहीये, वक्फ बोर्ड गेली कित्येक वर्ष मनमानी कारभाराने लोकांवर जी दहशत बसवतंय त्याला चाप कसा बसवणार हा आहे ? असं सांगत संसदेच्या याच अधिवेशनात वक्फ सुधारणा विधेयक मंजूर करावे अशी मागणी मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी केली आहे. राज ठाकरे यांनी फेसबुक पोस्टवर म्हटलंय की, काही महिन्यांपूर्वी संसदेत वक्फ कायद्यात सुधारणा सुचवणारं विधेयक केंद्र सरकारने सादर केलं होतं, त्यावर मुस्लिमधार्जिण्या विरोधी पक्षांनी संसदेत गोंधळ घातला आणि त्यामुळे हे विधेयक संसदीय समितीकडे पुनर्विचारासाठी पाठवलं गेलं.

पान २ वर

## निष्ठा सिद्ध करण्यासाठी ठाकरेंच्या शिवसैनिकांनी घेतली दर्ग्यात शपथ

● रत्नागिरी, आकांक्षा नार्वेकर :

नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत उद्धव ठाकरेंच्या पक्षाचा कोकणात धुव्वा उडाला. कोकणातील सर्व जागांवर महायुतीच्या उमेदवारांनी बाजी मारली. रत्नागिरी, राजापूर या मतदारसंघातही ठाकरेंचे उमेदवार पराभूत झाले. त्यामुळे पक्षातील अंतर्गत बैठकीत पदाधिकाऱ्यांमधील वाद उफाळून आला. लोकसभेत याठिकाणी विनायक राऊत यांचा नारायण राणेंनी पराभव केला त्यानंतर विधानसभेतही पक्षाला फटका बसला. त्यामुळे विनायक राऊतांनी पक्षातील पदाधिकारी कार्यकर्त्यांची बैठक आयोजित केली होती. यात पक्षातील वाद चव्हाट्यावर आला. त्यातच ठाकरेंच्या कार्यकर्त्यांनी पक्षावरील निष्ठा सिद्ध करण्यासाठी थेट दर्गा गाठला.



कोकणात शपथ घेण्याला फार महत्त्व असते, एखाद्या प्रसिद्ध मंदिरात, जागृत देवस्थान किंवा ग्रामदेवतेकडे जाऊन शपथ घेतली जाते. यात ठाकरेंच्या शिवसैनिकांनी पीर बाबर शेख दर्गा गाठून तिथे पक्षातील निष्ठेची शपथ घेतली त्यामुळे ते चर्चेत आले आहेत. आपण चुकीचं काम केले नाही. पक्षाचा विश्वासघात केला नाही असा या कार्यकर्त्यांचा दावा होता.

## ॲड. राहुल नार्वेकर यांची विधानसभा अध्यक्षपदी एकमताने निवड

● मुंबई, यश सावंत :

विधीमंडळाच्या विशेष अधिवेशनात विधानसभा सदस्य ॲड. राहुल नार्वेकर यांची १५ व्या विधानसभेच्या अध्यक्षपदी एकमताने निवड करण्यात आली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी ॲड. राहुल नार्वेकर यांच्या विधानसभा अध्यक्षपदासाठीच्या नावाचा प्रस्ताव सभागृहात मांडला. या प्रस्तावास सदस्य सर्वश्री अनिल पाटील, ॲड. आशिष शेलार, चंद्रकांत पाटील यांनी अनुमोदन दिले. यानंतर हंगामी विधानसभा अध्यक्ष कालिदास कोळंबकर यांनी ॲड.राहुल नार्वेकर यांच्या नावाचा विधानसभा अध्यक्ष पदासाठीचा प्रस्ताव संमत झाल्याची घोषणा केली. ॲड.राहुल नार्वेकर यांची विधानसभा अध्यक्ष म्हणून बिनविरोध निवड झाली.



ॲड. राहुल नार्वेकर यांच्या निवडीनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, विधानसभा सदस्य सर्वश्री चंद्रशेखर बावनकुळे, नाना पटोले, जयंत पाटील, नितीन राऊत हे ॲड. नार्वेकर यांना अध्यक्षपदी स्थानापन्न होण्यासाठी अध्यक्षपदाच्या आसनापर्यंत सन्मानपूर्वक घेवून गेले. सभागृहातील सर्व सदस्यांनी ॲड. नार्वेकर यांचे अभिनंदन केले.

## नवीन ठाणे रेल्वे स्थानकाच्या शेजारील उच्च दाब वीज वाहिनीच्या पर्यायावर महिनाभरात तोडगा काढण्याचे महापालिका आयुक्त सौरभ राव यांचे निर्देश

● ठाणे, रोहित जैसवाल :

ठाणे-मुलुंड दरम्यान होत असलेल्या नवीन रेल्वे स्थानकाच्या शेजारील उच्च दाब वीज वाहिनीच्या पर्यायावर महिनाभरात तोडगा काढण्याचे निर्देश महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी दिले आहेत. ठाणे आणि मुलुंड दरम्यान मनोरुग्णालयाच्या लगत ठाणे स्मार्ट सिटीअंतर्गत नवीन रेल्वे स्टेशन बांधण्यात येत आहे. यामध्ये रेल्वे परिचलन क्षेत्रामधील ट्रॅक बांधणे, रेल्वे स्टेशन इमारत बांधकाम बांधणे



आदी अनुषंगिक कामे रेल्वेकडून तर,परिचलन क्षेत्राच्या बाहेरील डेक, रॅम्प आदी अनुषंगिक कामे स्मार्ट सिटीच्यावतीने करण्यात येत आहेत. त्या कामाची पाहणी महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी नुकतीच केली. त्यावेळी, अतिरिक्त आयुक्त (१) संदीप माळवी, अतिरिक्त आयुक्त (२) प्रशांत रोडे, उप नगर अभियंता सुधीर गायकवाड, कार्यकारी अभियंता धनाजी मोदे, महावितरणचे अधिकारी आदी उपस्थित होते. या पाहणी दरम्यान या प्रकल्पाशी निगडित वेगवेगळ्या विषयांची आयुक्त राव यांनी माहिती घेतली. मध्य रेल्वेच्या मार्गावरून जाणाऱ्या उच्च दाब वीज वाहिनीमुळे काम थांबू नये, यासाठी आयुक्तांनी महावितरणच्या अधिकाऱ्यांना १५ डिसेंबरपर्यंत तात्पुरती उपाययोजना आणि महिनाभरात पर्यायी उपाययोजना काढण्याचे निर्देश दिले. तसेच, या वाहिनीचा टॉवर हटवून ही वाहिनी भूमिगत करण्याबाबत रेल्वे, महापालिका आणि महावितरण यांनी एकत्रित मार्ग काढावा, असेही आयुक्तांनी सांगितले. नवीन उपनगरीय रेल्वे स्थानकाच्या कामामुळे बाधित होणाऱ्या झोपडीधारकांचे पुनर्वसन करण्याबाबतही तत्काळ कार्यवाही करण्याचे निर्देशही आयुक्त राव यांनी महापालिकेच्या अधिकाऱ्यांना दिले. या पाहणीदरम्यान, आयुक्त राव यांनी आतापर्यंत झालेले काम, पोहोच मार्गाचे काम, पूल आदी कामांचा आढावा घेतला.

# येत्या २४ तासांत थंडीचा जोर वाढणार

## ९ वर्षांतील सर्वात कमी तापमानाची नोंद



● मुंबई, विशाल कारंडे :

ऐन थंडीत गेल्या काही दिवसात अरबी समुद्रावर तयार झालेल्या कमी दाबाच्या पट्ट्याने पावसाला पोषक वातावरण तयार झाले होते. आधीच दमट वातावरण असलेल्या मुंबईतील नागरिक कमालीचे तापमान आणि उकाड्याने हैराण होत घामाने डबडबले होते. पण शेवटी मुंबईकरांना कपाटातील स्वेटर बाहेर काढावेच लागल्याचं दिसतंय. मुंबईत गेल्या ९ वर्षांतील सर्वात कमी तापमानाची नोंद झाली आहे. मुंबई आणि सांताक्रूझ केंद्रात सोमवार (९ डिसेंबर) १३.७ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली.यापूर्वी डिसेंबर २०१५ मध्ये किमान तापमान ११.४ अंश सेल्सियस एवढे नोंदवले गेले होते.

उत्तरेकडील राज्यांमध्ये वादळी थंड वारे वाहत आहेत. पंजाब आणि हरियाणामध्ये धुराचे प्रचंड लोट पसरले आहे. तर राजस्थानमधील

### मुंबई महाबळेश्वरपेक्षा थंड?

"सर्वात थंड ठिकाण असलेल्या महाबळेश्वरच्या तुलनेत आज मुंबईत किमान तापमानाची नोंद झाली आहे. मुंबई गारठली असून गेल्या नऊ वर्षांतल्या सर्वात कमी तापमानाची नोंद झाली. मुंबईतील सांताक्रूझ केंद्रात १३.७ अंश सेल्सिअस होती. या भागात किमान तापमान १९.२ अंश सेल्सिअस नोंदवण्यात आले आहे. महाबळेश्वरमध्ये किमान तापमान १५ अंश सेल्सिअस नोंदले गेले.

थंडीच्या लाटेमुळे महाराष्ट्रात कोरडे व थंड वारे वाहत असून, उत्तरेकडून येणाऱ्या वाऱ्यांमुळे मुंबईत थंडीचा जोर वाढल्याचं सांगण्यात येत असून येत्या २४ तासांत मुंबईकरांना हुडहुडी भरणार आहे. मुंबईकरांना आता स्वेटर आणि कानटोप्या बाहेर काढावे लागणार आहे. आज मुंबईत गेल्या ९ वर्षांतील नीचांकी तापमान नोंदले गेले असून मुंबईला थंडीच्या परिस्थितीचा सामना करावा लागत आहे.

पान २ वर

## स्थानिक गुन्हे शाखेकडून मोटार सायकल चोरास अटक...

● पालघर, सुचिता सोनावणे :

पालघर रेल्वे स्थानक परिसरात मोटार सायकल चोरट्यांनी थैमान घातलेले असून त्यापैकी दोन मोटरसायकलीचा शोध घेऊन आरोपीस अटक करण्यास स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांना यश आले आहे.

दिनांक १५ जुलै २०२४ रोजी पालघर रेल्वे स्थानक पार्किंग जवळ पार्किंग केलेली मोटरसायकल क्रमांक एम एच ४८ सीई ५८१९ तसेच दिनांक २० नोव्हेंबर २०२३ रोजी पालघर रेल्वे स्थानक जवळ पार्किंग करून



ठेवलेली मोटरसायकल क्रमांक एम एच ४८ सीएफ ५०२२ या दोन्ही मोटार सायकल कोणीतरी अज्ञात चोरट्यांनी चोरून नेले बाबत वेगवेगळ्या फिर्यादी दाखल करण्यात आली होती.

या दोन्ही फिर्यादीच्या अनुषंगाने वरील दोन्ही गुन्हा मधील चोरीस गेलेले वाहनांचा व अज्ञात आरोपींच्या शोध घेऊन गुन्हा उघडकीस आणण्याकरिता पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील, अप्पर पोलीस अधीक्षक विनायक नरळे उपविभागीय पालघर पोलीस अधिकारी अभिजीत धाराशिवकर यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे प्रभारी पोलीस निरीक्षक प्रदीप पाटील यांनी पथक नेमून गुन्हांचा समांतर तपास करत तांत्रिक पद्धतीने तसेच गोपनीय माहितीच्या आधारे शोध घेतला असता इसम बिजय क्रीष्णा घोष वय ४३ व्यवसाय मजुरी डोंगरपाडा यांनी सदर मोटरसायकली चोरी केल्याचे उघडकीस झाले आहे.

## संपादकीय

संपादक - राकेश शंकर गोरे

# दुरुस्ती विधेयकाचा अन्वयार्थ 'वक्फ'

एका धक्कादायक घटनेत, देशमुखांच्या लातूरमध्ये अहमदपूरमधील तळेगावच्या १०३ शेतकऱ्यांना 'वक्फ बोर्डा'ने नोटीस पाठवली आहे. महाराष्ट्र राज्य 'वक्फ' न्यायाधिकरण छत्रपती संभाजीनगरच्या न्यायालयाकडून, याबाबत याचिका दाखल करण्यात आली आहे. मात्र, या शेतकऱ्यांकडून 'वक्फ बोर्डा'च्या या दाव्याचा विरोधही करण्यात आला आहे. वडिलोपार्जित जमिनी पिढ्यान्पिढ्या आपल्याच वहिवाटीखाली असून, 'वक्फ बोर्डा'चा त्याच्याशी काहीही संबंध नाही असे या शेतकऱ्यांनी म्हटले आहे. यासाठी शेतकऱ्यांनी एका लेखी निवेदन दिले असून, आपल्याला या प्रकरणी शासनाने न्याय मिळवून द्यावा अशी विनंतीही या शेतकऱ्यांनी केली आहे. देशमुखांची लातूर ही गढी गेली कित्येक दशके प्रसिद्ध आहे. विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराच्या दरम्यान देशमुखांनी प्रचारात ऐरणीवर आलेल्या धर्माच्या मुद्याबाबत बोलताना, ते आमचे आम्ही पाहून घेऊ, अशी दर्पोक्ती केली होती. त्यामुळे आता 'वक्फ बोर्डा'ने निरपराध अशा शेतकऱ्यांच्या जमिनींवर जो ताबा मागितला आहे, त्याबाबत त्यांनी तातडीने त्यांची भूमिका जाहीर केली तर बरे होईल.

देशमुखांच्या लातूर येथे नेमके काय झाले, हे समजून घेतले तर 'वक्फ बोर्डा'ला का विसर्जित केले पाहिजे, ते समजून येईल. १०३ शेतकऱ्यांच्या वडिलोपार्जित तब्बल ३०० एकर शेतजमिनींवर 'वक्फ बोर्डा'ने दावा केला आहे. अर्थात, ही त्यांची कार्यपद्धतीच आहे. संबंधित शेतकऱ्यांना याद्वारे नोटिसाही बजावण्यात आल्या आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये भीती आणि असुरक्षिततेचे वातावरण निर्माण झाले आहे. शेतकऱ्यांनी ही वडिलोपार्जित जमीन असल्याचे म्हटले असले, तरी 'वक्फ बोर्डा'ने बजावलेली नोटीस ही सरळसरळ त्यांची मालमत्ता कशी बळकावली जाते, याचे उत्तम उदाहरण ठरावे. आपलीच मालकी सिद्ध करण्यासाठी या शेतकऱ्यांना आता कायदेशीर लढा द्यावा लागणार आहे, हे दुर्दैवच. केंद्रातील भाजप सरकारने 'वक्फ बोर्ड दुरुस्ती विधेयक' का सादर केले, हे आता सामान्यांना समजून येईल. शरद पवार यांची सुकन्या संसदरत्न सुप्रिया सुळे यांनी मात्र आताच असे काय घडले, म्हणून हे विधेयक आणले जात आहे, अशी सात्विक संतापातून संसदेत जी विचारणा केली होती, त्यालाही लातूरच्या घटनेने उत्तर मिळाले असेल.

विधानसभा निवडणुकीत महाराष्ट्रातील जनतेने महायुती सरकारला निर्विवाद कौल दिला. महायुतीला मिळालेले यश हे देदीप्यमान असेच. यापूर्वी महाराष्ट्रात कोणत्याही पक्षाच्या सरकारला इतका स्पष्ट जनादेश मिळालेला नव्हता. २०१९ मध्ये महाराष्ट्रातील जनतेने भाजप-शिवसेना युतीलाच स्पष्ट बहुमत दिले होते. तथापि, उद्धव ठाकरे यांच्या मुख्यमंत्री होण्याच्या लालसेपोटी त्यांनी या जनादेशाची अवहेलना केली आणि काँग्रेस-राष्ट्रवादीच्या पाया पडून, स्वतःचा राज्याभिषेक करवून घेतला. कोमट सल्ले देणारा, घरातून बाहेर न पडणारा, मंत्रालयात न जाणारा, जनहिताच्या सर्व प्रकल्पांना स्थगिती देणारा, कोरोना साथमारीच्या काळात मृतदेहांच्या टाळूवरचे लोणी खाणारा, असे सर्व नको ते विक्रम उद्धव ठाकरे यांच्या नावावर त्यांच्या मुख्यमंत्रिपदाच्या अडीच वर्षांच्या कालावधीत जमा झाले. त्यांच्या वैयक्तिक महत्त्वाकांक्षेसाठी जनतेच्या हिताचा बळी त्यांनी दिला. म्हणूनच, असा प्रकार पुन्हा घडू नये, यासाठीच महाराष्ट्रातील जनतेने भरघोस मते महायुतीच्या पारड्यात घातली असेही म्हणता येते.

विरोधकांना विशेषतः शरद पवार यांच्यासारख्या ज्येष्ठ नेत्याला, अद्यापही हा पराभव पचवता आलेला नाही. त्यांनी 'ईव्हीएम'वरून पुन्हा एकदा राजकारण चालवले आहे. आकडेवारीचे दाखले देत, त्यांनी महाराष्ट्रातील जनतेची केलेली दिशाभूल करण्याचा जो प्रयत्न केला, तो मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आकडेवारीचाच दाखला देत हाणून पाडला आहे. काँग्रेस आणि उद्धव ठाकरे या दोघांनीही शरद पवारांचेच अनुकरण केले आहे. हे सगळे विस्ताराने नमूद करण्याचे कारण एवढेच की, याच महाविकास आघाडीने मुस्लिमांचे लांगूलचालन करण्यासाठी त्यांच्या १७ मागण्या मान्य केल्या होत्या. यात 'वक्फ बोर्डा'ला एक हजार कोटी रुपये निधी देण्याचीही एक मागणी होती. तसेच सत्तेवर आल्यानंतर, संविधानाची हत्या करत धर्माच्या आधारे आरक्षण देणे, घटनाबाह्य असताना मुस्लिमांना दहा टक्के आरक्षण देऊ, असेही त्यांनी म्हटले होते. कर्नाटकात काँग्रेस जे सत्तेवर आले, ते तेथील मुस्लिमांच्या एकगठ्ठा मतांच्या जोरावर. तेथे 65 जागांवर भाजपचा निसटता पराभव झाला आणि ते राज्य हातातून गेले. तेथेही काँग्रेसने मुस्लिमांच्या अशाच अवास्तव मागण्या मान्य केल्या होत्या, म्हणूनच त्यांना मते मिळाली का? हाही प्रश्न आहे. निकाल जाहीर झाल्यानंतर, तो खुल्या मनाने स्वीकारून विरोधकांनी आता विरोधकांची भूमिका पार पाडणे अत्यंत आवश्यक असेच आहे. सुदृढ लोकशाहीचे ते प्रतीक आहे. असे असतानाही, विरोधक अजूनही निवडणुकीच्या निकालाचेच तुणतुणे वाजवत आहेत. लोकशाहीची क्रूर चेष्टा करत, मविआच्या लोकप्रतिनिधींनी पहिल्या दिवशी शपथही घेतलेली नाही. हा त्यांना ज्या मतदारांनी निवडून दिले, त्यांचा अवमान नव्हे का? इतके भान मविआच्या नेत्यांना असते, तर त्यांना लातूरच्या शेतकऱ्यांची व्यथाही समजून आली असती. ज्या जमिनी पिढ्यान्पिढ्या मालकीच्या आहेत, त्याच जमिनीवर 'वक्फ बोर्डा'ची नोटीस मिळाली म्हणून न्यायालयात अधिकार सिद्ध करून पुन्हा त्यावर आपली मालकी दाखवायची, असा हा तुघलकी कारभार आहे. या शेतकऱ्यांना विरोधकांकडून काही न्याय मिळेल, अशी आशा बाळगणे म्हणजे फार भाबडेपणाचे ठरेल. तथापि, आता राज्यात महायुतीचे सरकार आहे. हे सरकार लांगूलचालन करणारे नाही, तर थेट कारवाई करणारे आहे. विशाळगड तसेच प्रतापगडावरील अतिक्रमणे याच सरकारने उद्ध्वस्त केली होती. 'वक्फ बोर्डा'चे समर्थन करणारे जे कोणी खा. सुप्रिया सुळे यांच्यासारखे नेते आहेत, त्यांनी शहाणे होत यात पडूच नये. महायुती सरकार विकासाभिमुख सरकार असले, तरी आपल्या हक्कांसाठी लढणारे सरकार आहे. लातूरच्या शेतकऱ्यांना न्याय मिळेलच, तथापि, 'वक्फ बोर्डा'त दुरुस्तीचे विधेयक का आणले ते महाराष्ट्रातील जनतेला या निमित्ताने समजेल, इतकाच याचा अन्वयार्थ.

# मूलभूत हक्कांचे संरक्षण करणारे राज्य मानवी हक्क आयोग

संयुक्त राष्ट्राकडून दरवर्षी १० डिसेंबर रोजी मानवी हक्क दिन साजरा केला जातो. मानवी हक्कांची संकल्पना नैसर्गिक विधी ह्या संकल्पनेचे अपत्य आहे. जन्मानेच माणूस काही हक्क घेऊन येतो. त्या गृहीतकृत्यांवर ह्या हक्कांची मांडणी करण्यात येते. मानवी हक्क किंवा मानवी अधिकार हे मानवाचे मूलभूत हक्क आहेत. मानवी हक्क हे जागतिक असून सर्वांना समान असतात. हे हक्क उपजत असतात किंवा कायदेशीर असू शकतात. खाली दिलेले जीवनाधिकार, यातनांपासून मुक्तता, गुलामगिरीपासून मुक्तता, कोर्ट सुनावणीचा अधिकार, भाषण स्वातंत्र्य, वैचारिक व धार्मिक स्वातंत्र्य हे काही मानवी हक्क प्रमुख हक्क मानले जातात. अशा या मानवी हक्कांचे उल्लंघन होत असल्यास महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाकडे दाद मागता येते. कोणत्याही शुल्काशिवाय व वकिलांशिवाय आयोगाकडे तक्रार करता येते. मानवी हक्क म्हणजे सर्व मानवांचे अनन्य संक्राम्य असलेले मूलभूत हक्क. मानवी हक्क हे देश, स्थान, भाषा, धर्म, मानववंशीय उद्गम, लिंग, जात, जमात इत्यादींच्या पलीकडे सार्वत्रिक अशा स्वरूपाचे आहेत. राष्ट्रसंघाच्या (यूनो) परिषदांनुसार व संकेतांनुसार व मानवी हक्काच्या सार्वत्रिक घोषणांमध्ये भर दिल्यानुसार कोणत्याही देशामध्ये कोणतीही राजकीय, आर्थिक किंवा सांस्कृतिक पद्धती अंमलात असली तरीही सर्व मानवी हक्कांचे संरक्षण करणे हे व त्यांना प्रोत्साहन देणे त्या-त्या राज्याचे कर्तव्य आहे. त्यानुसार भारतामध्ये मानवी हक्क संरक्षण अधिनियम, १९९३ अस्तित्वात आला. या अधिनियमाचे उद्दिष्ट सीमित असले, म्हणजेच मानवी हक्क आयोग हा केवळ सार्वजनिक सेवकांनी केलेल्या मानवी हक्कांच्या उल्लंघनाचीच चौकशी करू शकतो आणि केवळ शिफारस करणारे आदेशच जारी करू शकतो तरीही महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाने त्यांचे मर्यादित अधिकार व मर्यादित अधिकार क्षेत्र यामध्येही आयोगाला प्राप्त झालेल्या मानवी हक्क अधिकारांच्या उल्लंघनाच्या तक्रारींची चौकशी करणे व स्वतःहून पुढाकार घेऊन चौकशी करणे याद्वारे सार्वजनिक सेवकांनी केलेल्या मानवी हक्काच्या उल्लंघनामध्ये लक्ष घातले आहे. आयोग मानवी हक्कांच्या उल्लंघनाबाबतची गाऱ्हाणी व तक्रारी याकडे लक्ष देत आहे. महाराष्ट्र राज्यात मानवी हक्कांच्या स्थितीमध्ये सुधारणा करणे व सर्व समाजाच्या कल्याणासाठी मानवी हक्कांच्या संरक्षणाचे संवर्धन करणाऱ्या संस्कृतीला प्रोत्साहन देणे यासाठी महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग प्रयत्न करीत आहे.

### आयोगाचा परिचय

मानवी हक्क म्हणजे मानवी वर्तणुकीच्या दर्जाची विवरण करणारी काही नैतिक तत्त्वे किंवा रिवाज होय. या मानवी हक्कांचे आंतरराष्ट्रीय कायद्यामध्ये नियमितपणे संरक्षण होते.

मानवी हक्क सार्वत्रिक असणे, ते हक्क सर्व जगभरात समान असणे हा आंतरराष्ट्रीय मानवी हक्क कायद्यांचा पायाभूत मानक ठरला. १९४८ साली मानवी हक्कांच्या सार्वत्रिक घोषणांमध्ये या तत्त्वावर पहिल्यांदा भर देण्यात आला व अनेक आंतरराष्ट्रीय मानवी हक्क संमेलने, ठराव व घोषणांमध्ये या तत्त्वांचा पुनरुच्चार करण्यात आला आहे. भारताच्या घटनेमध्ये सुद्धा मानवी हक्कांच्या सर्व सार्वत्रिक घोषणेचा मूलभूत हक्क म्हणून समावेश केला आहे. भारताच्या संसदेने मानवी हक्क संरक्षण अधिनियम, १९९३ पारित केला. हा अधिनियम मानवी हक्कांच्या उल्लंघनाविरुद्ध सुरक्षितता प्रदान करतो. या अधिनियमामध्ये राष्ट्रीय मानवी हक्क आयोग व राज्य मानवी हक्क आयोगाची स्थापना करण्याचा तसेच जिल्हा स्तरावर मानवी हक्क न्यायालय स्थापन करण्याची तरतूद आहे.

### महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगा बद्दल

आंतरराष्ट्रीय संकेत व




मानवी हक्क संरक्षण अधिनियम, १९९३ यांच्यानुसार महाराष्ट्र राज्यामध्ये मानवी हक्कांचे संरक्षण करण्यासाठी महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाची स्थापना ६ मार्च २००१ रोजी झाली.

आयोगावर एक अध्यक्ष व दोन सदस्य आहेत. आयोगाकडे एक सचिव, एक विशेष पोलीस महानिरीक्षक व एक प्रबंधक आहेत. आयोगाचे पुढीलप्रमाणे तीन विभाग आहेत : (१) विधी विभाग, (२) प्रशासन विभाग, (३) अन्वेषण विभाग. आयोगाकरिता नियमित ५४ पदे मंजूर असून याशिवाय दोन वर्षांच्या कालावधीसाठी १५ काल्पनिक पदे मंजूर केली आहेत. अशाप्रकारे ६९ पदे निर्माण करण्यात आली आहेत. आयोगाचे कार्यालय प्रशासकीय अधिकारी महाविद्यालय आवार, ९, हजारीमल सोमाणी मार्ग, सी. एस. टी. समोर, मुंबई-४०० ००१ येथे आयोगाचे कार्यालय शासनाच्या गृह विभागाच्या नियंत्रणाखाली कार्यरत आहे.

### व्हिजन मिशन

मानवी हक्कांचे संरक्षण (सुधारणा) कायदा, २००६ द्वारे सुधारित केल्यानुसार मानवी हक्कांचे संरक्षण कायदा (PHRA), १९९३म्हणून स्थापित केले गेले आहे.

आयोगाची जबाबदारी जनतेमध्ये मानवी हक्क जागरुकता पसरवणे आणि मानवी हक्क साक्षरतेच्या क्षेत्रातील सर्व भागधारकांच्या प्रयत्नांना प्रोत्साहन देणे हे आहे.

मानवी हक्कांना घटनेने हमी दिलेले किंवा मूर्त स्वरूप दिलेले व्यक्तीचे जीवन, स्वातंत्र्य, समानता आणि प्रतिष्ठेशी संबंधित अधिकार म्हणून परिभाषित करते.

### आयोगाची रचना

महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग ही वैधानिक संस्था आहे. त्याची रचना खालीलप्रमाणे -

जी व्यक्ती एखाद्या उच्च न्यायालयाची मुख्य न्यायाधीश किंवा न्यायाधीश होती अशी व्यक्ती आयोगाची अध्यक्ष असेल. अशी व्यक्ती की जी उच्च न्यायालयाची न्यायाधीश होती किंवा आहे किंवा राज्यातील जिल्हा न्यायालयामध्ये न्यायाधीश होती किंवा आहे आणि त्या व्यक्तीला जिल्हा न्यायाधीश म्हणून किमान सात वर्षे अनुभव आहे, अशी व्यक्ती आयोगाची सदस्य असेल,

अशा व्यक्तीला आयोगाचा सदस्य नेमला जाईल की ज्या व्यक्तीला मानवी हक्कासंबंधित बाबींच्या संबंधित अनुभव असेल किंवा मानवी हक्कासंबंधित बाबींचे ज्ञान असेल.

### आयोगाचे कार्य

१. लोकसेवकाकडून मानवी हक्क भंग झाला आहे वा त्या बाबतीत त्यांनी अपप्रेरणा दिली आहे वा मानवी हक्क भंगाचा प्रतिबंध करण्यात दुर्लक्ष केले आहे, अशा प्रकरणी स्वप्रेरणेने वा ग्रस्त व्यक्तीकडून तक्रार आल्यावर चौकशी करणे.

२. न्यायालयाकडे प्रलंबित असलेल्या कार्यवाहीबाबत मानवी हक्क भंग झाल्याची तक्रार असेल, तर अशा बाबतीत संबंधित न्यायालयाच्या मान्यतेने हस्तक्षेप करणे.

३. कैद्यांच्या राहणीमानाची पाहणी व अभ्यास करण्यासाठी राज्य शासनाला सूचना देऊन, तुरुंगांना वा ज्या संस्थेत कैद्यांना उपचारार्थ वा सुधारण्यासाठी वा संरक्षणाखाली ठेवले असेल, अशा ठिकाणांना भेटी देणे.

४. मानवी हक्क संरक्षणार्थ राज्यघटना वा कोणत्याही विद्यमान कायद्याखाली पुरविण्यात आलेल्या सुरक्षिततेसंबंधीच्या तरतुदींचा आढावा घेणे व अशा तरतुदींच्या परिणामकारक अंमलबजावणीसाठी शिफारशी करणे.

५. मानवी हक्कांचा संकोच करणाऱ्या अतिरेकी व इतर घटकांचा आढावा घेणे व योग्य ती उपाययोजना सुचविणे.

६. मानवी हक्कांवरील प्रबंध व आंतरराष्ट्रीय कायदेशीर शोधग्रंथांचा अभ्यास करणे व त्यांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी शिफारशी करणे.

७. मानवी हक्कांसंबंधी संशोधनाचे काम हाती घेणे व प्रोत्साहन देणे.

८. समाजातील विविध प्रवर्गात मानवीहक्कांविषयी जाणीव निर्माण करणे आणि प्रसिद्धी व प्रसार माध्यमे, संमेलने व अन्य उपलब्ध साधनांद्वारे मानवीहक्क संरक्षणाच्या उपलब्ध तरतुदींविषयी जागृती वाढावी म्हणून प्रयत्न करणे.

९. मानवी हक्क क्षेत्रात कार्य करणाऱ्या अशासकीय संघटना व संस्थांच्या प्रयत्नांना प्रोत्साहन देणे.

### आयोगाकडे तक्रार करतानाची कार्यपद्धती किंवा आयोग स्वत:हून कृती करील तेव्हाची कार्यपद्धती

१. मानवी हक्कांचा भंग झाल्याची तक्रारी पीडित व्यक्ती किंवा त्या व्यक्तीतर्फे अन्य व्यक्ती तक्रार दाखल करू शकेल. सदर तक्रार मराठी, हिंदी किंवा इंग्रजी भाषेत करता येईल. सदर तक्रार ऑनलाईन किंवा टपालाने सादर करता येईल.

२. तक्रार करताना कोणतेही शुल्क द्यावे लागणार नाही, कोणतेही कोर्ट फी तिकीट लावावे लागणार नाही. वकील नेमण्याची गरज नाही.

३. कोणत्याही शासकीय सेवकांविरुद्ध तक्रार करायची असेल तर ती आयोगाच्या अध्यक्षांना उद्देशून करायची असते व त्यामध्ये खालील तपशील असणे आवश्यक आहे:-

तक्रारदाराचे पूर्ण नाव, तक्रारदाराचा पूर्ण टपालाचा पत्ता, टेलिफोन क्रमांक / ई-मेल क्रमांक, घटनेची तारीख व स्थळ, घटना केव्हा घडली ती वेळ, मानवी हक्कांच्या उल्लंघनाच्या घटनांचा तपशील स्पष्ट करा.

कोणत्या शासकीय सेवकाविरुद्ध / शासकीय विभागाविरुद्ध / शासकीय संस्थेविरुद्ध / शासकीय प्राधिकरणाविरुद्ध तक्रार केली जात आहे?

सदर बाब कोणत्याही न्यायालयात, राष्ट्रीय मानव हक्क आयोगात, न्यायासनात किंवा अन्य वैधानिक मंचाकडे प्रलंबित आहे काय ?

आयोगाकडे येण्याची कारणे

संस्थात्मक स्वायत्तता व स्वातंत्र्य

सोपी उपलब्धता

कोणतेही शुल्क आकारले जात नाही

कमी किचकट कार्यपद्धती

त्वरित न्याय

कोणत्याही व्यावसायिक वकिलाच्या सहाय्याची गरज नाही

आयोगाचा पत्ता व संपर्क

पत्ता : हजारीमल सोमाणी मार्ग, सीएसएमटी स्टेशन, मुंबई - ४०० ००१

वेबसाइट दुवा : http://www.mshrc.gov.in

दूरध्वनी : ०२२२२०७६४०८

ईमेल : complaint-mshrc@gov.in

नागरिकांनी आपल्या मानवी हक्कांसंदर्भात सजग राहणे आवश्यक आहे. नागरिकांच्या मूलभूत हक्कांचे उल्लंघन झाल्यास त्यांना न्याय देण्याचे राज्य मानवी हक्क आयोग हे एक हक्काचे ठिकाण आहे. मानवी हक्कांबाबत जनजागृती करणे व तळागाळातील नागरिकांपर्यंत मानवी हक्कांची अंमलबजावणी होण्यासाठी आयोग कार्यरत आहे. त्यामुळे जर कोणाच्या मानवी हक्कांचे उल्लंघन झाले असे वाटल्यास त्या नागरिकांनी आयोगाच्या कार्यालयाशी संपर्क साधून आपल्या हक्कांचे संरक्षण करू शकता.

**नंदकुमार बलभीम वाघमारे,**
**माहिती अधिकारी**
**जिल्हा माहिती कार्यालय, ठाणे**

## पान १ वरून...

## महाराष्ट्र- कर्नाटक सीमा वाद...

पण उद्या होणाऱ्या या महामेळाव्याला परवानगी मिळणार का, असा प्रश्नही उपस्थित होत आहे. नुकत्याच मिळालेल्या माहितीनुसार, बेळगाव सीमेवरच महाराष्ट्र एकीकरण समितीच्या अनेक कार्यकर्त्यांना अडवण्यात आले असून अनेकांना पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे. अनेकांना ताब्यात घेण्यात आले. बेळगावच्या सीमेवर मराठी माणसांना अडवण्यात आल्याची माहिती आहे. बेळगावात आयोजित करण्यात आलेल्या मेळाव्याला मराठी भाषिकांनी जाऊ नये म्हणून कर्नाटक सीमेवर कोनगोळी टोलनाक्यावर मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. शिवसेनेच्या अनेक कार्यकर्त्यांनाही रोखण्यात आल्याचे सांगण्यात येत आहे. तसेच, बेळगाव हद्दीत येणाऱ्या प्रत्येक वाहनाचीही कसून तपासणी केली जात आहे.

## राज्यसभा अध्यक्षांना हटवण्याची...

संसदेच्या सध्या सुरू असलेल्या हिवाळी अधिवेशनात दोन्ही सभागृहातील तापमान वाढू लागले आहे. आता विरोधी पक्ष इंडिया ब्लॉक राज्यसभेचे अध्यक्ष जगदीप धनखड यांना हटवण्यासाठी अविश्वास प्रस्ताव आणण्याच्या तयारीत आहे. अध्यक्ष जगदीप धनखर यांच्या विरोधात विरोधी आघाडी एकत्र आली असून समाजवादी पक्ष (एसपी) आणि तृणमूल काँग्रेस (टीएमसी) देखील अविश्वास प्रस्तावाच्या बाजूने असल्याचे सांगितले जात आहे. गेल्या काही दिवसांपासून इंडिया आघाडीपासू दूर राहिलेल्या टीएमसी आणि सपा खासदारांनीही अविश्वास ठरावावर स्वाक्षरी केली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, विरोधी पक्ष मंगळवारी राज्यसभेत सभापतींविरोधात अविश्वास प्रस्ताव आणू शकतात. अविश्वास प्रस्ताव तयार असून त्यावर 70 सदस्यांनी स्वाक्षरी केल्याचे सांगण्यात येत आहे. सोमवारी राज्यसभेत जॉर्ज सोरोस यांच्या मुद्द्यावरून झालेल्या गदारोळात अध्यक्ष जगदीप धनखड यांची भूमिका पाहता काँग्रेस त्यांच्याविरोधात अविश्वास प्रस्ताव आणण्याची तयारी करत असल्याचे सांगण्यात येत आहे. जॉर्ज सोरोस यांच्याशी संबंधित मुद्द्यावरून राज्यसभेत सोमवारी ज्याप्रकारे गदारोळ झाला, त्यावरून काँग्रेस आणि इतर विरोधी पक्षांचे सदस्य अध्यक्ष जगदीप धनखर यांच्यावर नाराज असल्याचे सांगितले जाते. विशेष म्हणजे राज्यसभेच्या अध्यक्षांना हटवण्यासाठी या प्रस्तावावर ५० सदस्यांच्या सह्या आवश्यक आहेत. सभापती धनखर यांच्या विरोधातील ठरावावर ७० सदस्यांनी सह्या केल्या आहेत. संसदेच्या गेल्या पावसाळी अधिवेशनात विरोधकांनी सभापतींना हटवण्याचा प्रस्ताव आणल्याची चर्चा होती, मात्र त्यानंतर विरोधकांनी तो स्थगित ठेवला होता.राज्यसभेच्या अध्यक्षांना पदावरून हटवण्यासाठी किमान ५० सदस्यांच्या स्वाक्षऱ्यांसह प्रस्ताव सचिवालयाकडे पाठवावा लागतो. किमान १४ दिवस अगोदर दिलेली ही नोटीस, राज्यसभेत उपस्थित असलेल्या सदस्यांच्या बहुमताच्या आधारे प्रस्ताव मंजूर झाल्यानंतर तो लोकसभेत पाठवावा लागतो. अध्यक्ष हे देशाचे उपराष्ट्रपती देखील आहेत, जे दुसरे सर्वोच्च घटनात्मक पद आहे. अशा स्थितीत त्यांना पदावरून हटवण्यासाठी हा प्रस्ताव लोकसभेतही मंजूर होणे गरजेचे आहे. हिवाळी अधिवेशन फक्त २० डिसेंबरपर्यंत चालणार आहे.

## येत्या २४ तासांत थंडीचा जोर...

उत्तरेकडून वाहणाऱ्या थंड वाऱ्यांमुळे येत्या २४ तासांत मुंबई, नाशिक आणि पुण्यनगरीत थंडीची तीव्रता वाढणार असल्याचे हवामान खात्याने म्हटले आहे. थंडी आणि अवकाळी पावसामुळे तापमान वाढले असते. नाशिक शहरातील पारा ९.४ अंश सेल्सिअस असताना निफाडमध्ये ६.७ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली असती. गेल्या आठवड्यात अवकाळी पावसाने थंडी गायब झाली होती. आता पुन्हा तापमानात घट होऊन थंडी वाढली आहे. येत्या १५ दिवसांत पुण्याला मोठा फटका बसणार आहे.भारतीय हवामान विभागाचे पुणे प्रमुख के. एस होसाळीकर यांनी X माध्यमावर याविषयी पोस्ट केली आहे. पुण्यात तापमानात येत्या पाच दिवसात कसे हवामान असणार याचा अंदाज वर्तवलाय. पुण्यात १३ ते १४ अंश तापमानाची नोंद केली जाण्याचा अंदाज आहे. तर येत्या काही दिवसात तापमान ११ अंशांवर जाणार असल्याचं सांगण्यात आलंय. थंडीमुळे मुंबईकरांचे हाल झाले आहेत. रविवारपासून मुंबईतील तापमानात घट होताना दिसत आहे. रविवारी १७.५ अंश सेल्सिअस किमान तापमानाची नोंद झाली. सोमवारी सकाळी १३.७ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. सांताक्रूझमध्ये १३.७ अंश सेल्सिअसची थंडी नोंदवण्यात आली, जी आतापर्यंतची सर्वात कमी आहे. अवघ्या तीन दिवसांत तापमान ११ अंशांनी घसरले जे सामान्यपेक्षा ५.६ अंशांनी कमी आहे. दुसरीकडे कुलाबा वेधशाळेत १९.२ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली.

## शेतकऱ्यांवर अन्याय नको,...

या सुधारित विधेयकावर महाविकास आघाडीतील पक्षांची भूमिका ही विरोधाची होती, हे वेगळं सांगायला नको. पण मुळात सुधारणा म्हणजे नक्की काय आहेत हे थोडक्यात समजून घेऊया असं त्यांनी सांगितले.

१) एखादी मालमत्ता वक्फ बोर्डाची आहे का नाही हे ठरवण्याचा अधिकार काढून घेतला जाणार आहे; वक्फ बोर्डाची जी मनमानी सुरु आहे त्यावरून हे किती आवश्यक आहे हे तुमच्या लक्षात येईल.
२) एखादी मालमत्ता वक्फ प्रॉपर्टी आहे का सरकारी जमीन आहे याचा निवडा पूर्वी वक्फ ट्रिब्युनलकडून केला जायचा आणि त्यात जागोजागी अतिक्रमणं केली गेली आहेत. हे नवीन विधेयक जर मंजूर झालं तर जिल्हाधिकारी हा यापुढे निवाडा करेल
३) वक्फ बोर्डावर मुस्लिम महिलांचा समावेश असला पाहिजे आणि तसंच मुस्लिमेतर समाजाचं पण प्रतिनिधित्व असलं पाहिजे
४) आणि कुठल्याही वक्फ बोर्डाच्या कारभाराचे ऑडिट करण्याचा अधिकार कॉम्प्ट्रोलर आणि ऑडिटर जनरलला राहील
५) आणि यापुढे एखाद्या व्यक्तीला त्याची संपत्ती वक्फ बोर्डाला द्यायची असेल तर त्याला पूर्वीसारखं बोली करार नाही तर लेखी करार करावा लागेल, ज्याने त्याला कायदेशीर चौकट मिळेल.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k. industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no. 12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist. Thane-401107, Maharashtra. Editor: Rakesh Shankar Gore. RNI REG. NO.: MAHBIL/2023/86118. Office contact no. 9702386118, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

# छत्रपती शिवाजी महाराजांचे पहिलं मंदिर भिवंडीत

**भिवंडी (विवेक गुंजाळ) -** महाराष्ट्राचे श्रद्धास्थान म्हणून ओळखल्या जाणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराज यांचे महाराष्ट्रातील पहिले मंदिर भिवंडी तालुक्यातील मराडे पाडा या ठिकाणी साकारत आहे. येत्या १७ मार्चला तिथीनुसार साजऱ्या होणाऱ्या शिवजयंती दिनी प्राणप्रतिष्ठा आणि मंदिराचा लोकार्पणाच्या भव्यदिव्य सोहळ्याचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती शिवक्रांती प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष राजूभाऊ चौधरी यांनी पत्रकार परिषदेत दिली आहे. याप्रसंगी प्रतिष्ठानचे पदाधिकारी ह.भ.प. कैलास महाराज निचीते, किल्ले रायगड येथील राजपुरोहित प्रकशस्वामी काशिनाथ जंगम यांसह प्रतिष्ठानचे विश्वस्त आणि सदस्य उपस्थित होते. ४ मार्च २०१८ ला भूमिपूजन झालेल्या मंदिराचे काम पूर्णत्वास आले आहे. मध्यंतरीच्या कोरोना संकटामुळे त्यामध्ये थोडा उशीर झाला असला तरी त्यानंतर अधिक जोमाने काम सुरू केले आहे. हे मंदिर फक्त दर्शनस्थळ न बनता शक्तीपीठ असावे, जेथे महाराजांचे जीवन समाजातील सर्व वर्गासाठी प्रेरणादायी राहील, असा कटाक्ष ठेवून या मंदिर उभारणीचा संकल्प केला होता, अशी माहिती अध्यक्ष राजूभाऊ चौधरी यांनी दिली आहे. महाराजांचे हे मंदिर गडकोट किल्ल्यांसारखे दिसावे म्हणून दीड एकर



जागेत उभारलेल्या मंदिराच्या भोवती तटबंदी आणि भव्य प्रवेशद्वार उभारण्यात आलं आहे. तटबंदीच्या खालील ३६ चबुतऱ्यांमध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांच्या विविध इतिहासकालीन प्रसंगांचे देखावे साकारण्यात आले आहेत.

### तटबंदी दीड एकर क्षेत्रात

■ या परिसरात केवळ मंदिर नव्हे तर गुरुकुल पद्धतीने शिक्षण देण्याची सुविधा व शस्त्र प्रशिक्षण केंद्र सुरू करण्याचा मनोदय आहे. गाभारा सभामंडप हा परिसर २५०० चौरस फूट क्षेत्राचा असून तटबंदी दीड एकर क्षेत्रात आहे. या ठिकाणी शिवकालीन शस्त्र प्रशिक्षण, वैदिक शिक्षण देण्याचा प्रयत्न संस्थेचा असून, हे मंदिर सर्वांना प्रेरणादायी ठरेल, असा विश्वास ह भ प कैलास महाराज नीचीते यांनी व्यक्त केला आहे.

या चित्राची माहिती येथे भेट देणाऱ्या सर्वभाषिक शिवभक्तांना कळावी यासाठी मराठी, हिंदी आणि इंग्रजीमध्ये चित्रा खाली लिहण्यात येणार आहे. अयोध्या येथील श्रीराम मंदिरात रामलल्ला यांची मूर्ती साकारणारे मैसूर येथील आंतरराष्ट्रीय कीर्तीचे मूर्तिकार अरुणयोगी राज यांच्या हातून अखंड कृष्णशिला काळ्या पाषाणातून सहा फूट उंचीची सिंहासनारूढ महाराजांची मूर्ती साकारण्यात आली आहे. या अखंड दगडातून साकारलेल्या या मूर्तीमधून चैतन्य कसे येईल याची काळजी मूर्ती घडविताना घेतली आहे, अशी माहिती राजूभाऊ चौधरी यांनी दिली.

## महापालिका लोकशाही दिनाचे ०६ जानेवारी रोजी आयोजन

**ठाणे (गणेश बागडे) :** ठाणे महापालिकेचा पुढील लोकशाही दिन ०६ जानेवारी २०२५ रोजी होणार आहे. तरी नागरिकांनी जानेवारी महिन्याच्या लोकशाही दिनाच्या १५ दिवस आधी म्हणजेच दिनांक २३ डिसेंबरपूर्वी त्यांचे अर्ज- निवेदने महापालिका भवन, नागरी सुविधा केंद्र येथे दोन प्रतीत सादर करावे. हे निवेदन दाखल करताना अर्जदाराने प्रत्येक निवेदना सोबत प्रपत्र-१ (ब) सादर करणे आवश्यक आहे. प्रपत्र-१ (ब) नागरी सुविधा केंद्र येथे उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे.

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाकडील परिपत्रक क्र. प्रसुधा-१०९९/सीआर-२३/९८/१८-अ, दिनांक २६ सप्टेंबर २०१२ नुसार माहे डिसेंबर- २०१२ पासून लोकशाही दिनाच्या दिवशी नागरिकांची निवेदने न स्विकारता, हे निवेदन दोन प्रतीत लोकशाही दिनाच्या १५ दिवस आधी महापालिका कार्यालयात सादर करणे आवश्यक असल्याचे आदेश काढण्यात आले आहेत.

मुख्यालयातील या लोकशाही दिनामध्ये, परिमंडळ लोकशाही दिनामध्ये ज्या नागरिकांनी आपली निवेदने सादर केलेली आहेत, तसेच ज्या निवेदनावर १ महिन्यापर्यंत कोणतीही कार्यवाही झाली नाही, अशाच निवेदनांचा स्वीकार करण्यात येईल. नागरिकांनी महापालिका मुख्यालयातील लोकशाही दिनामध्ये निवेदन सादर करताना परिमंडळ लोकशाही दिनामध्ये मिळालेला टोकन क्रमांक नमूद करणे आवश्यक आहे.

अर्जदाराने एका अर्जात एकच तक्रार सादर करावी, एकापेक्षा जास्त तक्रारी असलेला अर्ज स्वीकारला जाणार नाही. त्याचप्रमाणे आस्थापना विषयक, विविध न्यायालयात, लोकआयुक्त यांचेकडे प्रलंबित असलेल्या प्रकरणाच्या तक्रारी, माहिती अधिकार कक्षेत येणारी प्रकरणे, तसेच राजकीय पक्षाच्या, नगरसेवकांच्या संस्थेच्या लेटरहेडवरील अर्ज, अंतिम उत्तर दिलेले आहे किंवा देण्यात येणार आहे, अशा प्रकरणी केलेला अर्ज, तक्रार वैयक्तिक स्वरुपाची नसेल

## डॉ. समीर तोडणकर यांच्या हस्ते सेवानिवृत्त होणाऱ्या २३ कर्मचाऱ्यांचा सन्मान



**ठाणे (रोहित जैसवाल) -** जिल्हा परिषदेच्या वतीने मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्या मार्गदर्शनाने प्रत्येक महिन्यात आनंददायी निवृत्ती वेतन योजना राबविण्यात येत आहे. त्याअनुषंगाने ऑक्टोबर व नोव्हेंबर महिन्यात सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सन्मान सोहळा आज, दि. ०९ डिसेंबर, २०२४ रोजी, जिल्हा परिषदेच्या सभागृहात पार पडला.

जिल्हा परिषदेच्या पशुसंवर्धन विभाग प्रमुख डॉ. समीर तोडणकर यांच्या शुभहस्ते २३ अधिकारी व कर्मचारी यांचा शाल, श्रीफळ, सन्मान चिन्ह, पेन्शन आदेश देऊन सन्मान करण्यात आला.

या प्रसंगी मार्गदर्शन करताना डॉ. समीर तोडणकर यांनी सर्व सेवानिवृत्त होणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांचे अभिनंदन करून पुढील आयुष्याकरिता सदिच्छा दिल्या. त्याचबरोबर ग्रामीण भागात ३८ पेक्षा अधिक काळ कामकाज केल्याबद्दल अभिनंदन केले. आरोग्य, शिक्षण तसेच विविध शासकीय योजना ग्रामस्थापर्यंत पोहोचवण्यासाठी सेवानिवृत्त कर्मचारी यांनी मोलाचे कामकाज केले आहे. यापुढे सेवानिवृत्ती नंतर स्वतःसाठी आणि उत्तम आरोग्यासाठी वेळ द्या, अशा सदिच्छा दिल्या. प्राथमिक शिक्षक जयदिप देशमुख व मिठाराम बोंद्रे यांनी जिल्हा परिषदेत सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचारी यांचा सत्कार कार्यक्रम नियोजन केल्याबद्दल आभार व्यक्त केले. ३८ वर्ष शिक्षक म्हणून कामकाज करता विद्यार्थ्यांना शेवटच्या दिवसापर्यंत शिकवण्याचा अनुभव समृध्द करणारा होता, अशी भावना व्यक्त केली.

यावेळी सामान्य प्रशासन विभागातील सहाय्यक प्रशासन अधिकारी कल्पना तोरवणे, कनिष्ठ प्रशासन अधिकारी मनोज देवकर तसेच जिल्हा परिषदेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. ऑक्टोबर महिन्यातील शिक्षण विभाग प्राथमिक ०७, सामान्य प्रशासन विभाग ०३, आरोग्य विभाग ०२ असे एकूण १२ तर नोव्हेंबर महिन्यातील शिक्षण विभाग प्राथमिक ०९, आरोग्य विभाग ०२ असे जिल्हा परिषदेचे एकूण ११ अधिकारी व कर्मचारी सेवानिवृत्त झाले आहेत. मुख्याध्यापक, प्राथमिक शिक्षक, कनिष्ठ सहाय्यक, आरोग्य सहाय्यक महिला, वाहन चालक, शिपाई या पदावरील अधिकारी व कर्मचारी सेवानिवृत्त झाले आहेत.

## ऑन ड्युटी पोलिस कर्मचाऱ्यानं आयुष्य संपवलं



**मुरबाड (आकाश कांबळे) :** ठाणे जिल्ह्यातील मुरबाडमधून धक्कादायक बातमी समोर आली आहे. पोलिसाने ऑन ड्यूटी असताना इमारतीवरून उडी घेऊन आय्युष्य संपवल्याचं समोर आलेय. याप्रकारामुळे परसरात एकच खळबळ उडाली असून मुरबाड पोलिसांची चर्चा ठाण्यात होत आहे. पोलिसाने इमारातीवरून उडी घेऊन आयुष्य का संपवलं? याचा तपास सध्या सुरू आहे. अद्याप ठोस असं कोणतेही कारण समोर आलेले नाही. मिळालेल्या माहितीनुसार, ठाण्यातील मुरबाड पोलीस ठाण्यात कार्यरत असलेले पोलीस हवालदार नामदेव चारस्कर यांनी इमारतीवरून उडी मारून आयुष्य संपवले. रविवारी रात्री आठ वाजण्याच्या सुमारास त्यांनी टोकाचे पाऊल उचलले. कामावर असतानाच असा टोकाचा निर्णय का घेतला? याबाबत परिसरात चर्चा सुरू आहे. मुरबाड पोलिसांत या घटनेमुळे एकच खळबळ उडाली आहे.

पोलिसांकडून या घटनेचा तपास सुरु आहे. नामदेव चारस्कर यांनी कामावर असताना टोकाचे पाऊल उचललं, पोलीस ठाण्याच्या बाजूला असलेल्या पोलीस वसाहतीच्या इमारतीत ते राहत होते. या इमारतीच्या गच्चीवरून त्यांनी रात्री साडे आठ वाजताच्या सुमारास उडी मारून आयुष्य संपवलं. त्यांच्या आत्महत्या मागचं नेमकं कारण समजू शकले नाही, मात्र या घटनेने पोलीस दलात खळबळ उडाली आहे. नामदेव चारस्कर यांनी आयुष्य संपवलं की त्यांची कुणी हत्या केली? याबाबत परिसरात चर्चा सुरू आहे.

## ठाणे जिल्ह्यातील शेतकऱ्यांना मिळणार 'फार्मर आयडी'

### ॲग्रिस्टॅक ही योजना यशस्वी राबविण्यासाठी प्रशासन सज्ज

**ठाणे (सम्यक कासार) -** विविध योजनांचा लाभ ठाणे जिल्ह्यातील शेतकऱ्यांपर्यंत जलद गतीने व परिणामकारकरित्या पोहोचवता यावा यासाठी कृषी क्षेत्रासाठी सर्वसमावेशक डिजीटल पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी ॲग्रिस्टॅक (Digital Public Infrastructure for Agriculture) ही योजना राबविण्यात येत असून या योजनेचे प्रत्यक्ष काम जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात सुरू करावे, असे निर्देश मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी दिले.

केंद्र शासनाने ॲग्रिस्टॅक योजनेच्या मार्गदर्शक सुचनेनुसार ॲग्रिस्टॅक हे कृषि क्षेत्रात डेटा आणि डिजिटल सेवा वापरुन शासनाच्या विविध योजनांचा लाभ पात्र शेतकऱ्यांपर्यंत जलद गतीने व परिणामकारकरित्या पोहचण्यासाठी मदत होणार आहे. ॲग्रीस्टॅक संकल्पनेच्या अंमलबजावणीसाठी गट विकास अधिकारी व ग्रामविकास अधिकारी यांचे नियोजन व कामकाजाकडे नियंत्रण असणार आहे, अशी माहिती कृषी विकास अधिकारी एम एम बाचोटीकर यांनी दिली.

सर्व ग्रामपंचायतींमार्फत कॅम्प नियोजन करण्यात येणार असून शेतकऱ्यांना फार्मर आयडी तयार करून देणार आहेत. शेतकऱ्यांचा व त्यांच्या शेतांचा आधार संलग्न माहिती संच निर्मितीमध्ये पथकातील कर्मचारी प्राथमिक जबाबदारी पार पाडणार आहेत.

कृषि क्षेत्रासाठी सर्वसमावेशक डिजिटल पायाभूत सुविधा निर्माण करणे हा ॲग्रिस्टॅक उपक्रमाचा उद्देश आहे. या प्रकल्पामुळे माहिती आधारित योग्य निर्णय घेणे, गरजू शेतकऱ्यांना योग्य वेळी सेवा प्रदान करणे, कृषि उपक्रमांची कार्यक्षमता सुधारण्यासाठी शक्य होईल. विविध शेतकरी आणि कृषि-केंद्रित योजनांची आखणी करणे व अंमलबजावणी करणे सुलभ होणार आहे.

## डोंबिवलीच्या हर्षल सरोदे यांनी सायकल वारीने पंढरपुर ते घुमान (पंजाब) यात्रा केली पूर्ण




**कल्याण (यश सावंत) :** श्री क्षेत्र पंढरपुर ते संत शिरोमणी श्री नामदेव महाराज यांची कर्मभूमी आणि त्यांच्या वास्तव्यामुळे पावन झालेले पंजाब मधील घुमान गाव पर्यंत भव्य रथयात्रा आणि सायकल यात्रा ही दिनांक १२ नोव्हेंबर रोजी सुरू करण्यात आली होती. या सायकल वारीत डोंबिवली एमआयडीसी निवासी मध्ये राहणाऱ्या ४८ वर्षीय हर्षल सरोदे यांनी भाग घेवून यशस्वीपणे २३ दिवसात एकूण २ हजार ६७४ किलोमीटर अंतर पार करून पूर्ण केली. या सायकल यात्रेसाठी श्री क्षेत्र पंढरपुर येथून अंदाजे १०० जणांनी सुरवात केली होती मात्र हर्षल यांनी सलग मदतीला असणाऱ्या वाहनाची मदत न घेता त्यांनी ही यात्रा पूर्ण केली. विशेष म्हणजे हर्षल यांच्या सायकल मध्ये कधी कधी प्रॉब्लेम निर्माण झाले होते पण अनेक जण त्यांच्या मदतीला येत असत. हर्षल सरोदे यांनी यापूर्वीही अनेकदा लांब पल्ल्यांच्या सायकल फेऱ्या पूर्ण केल्या आहेत. याबद्दल व इतर सामाजिक क्षेत्रात कामाबद्दल त्यांना अनेक पुरस्कार मिळाले आहेत. त्यांच्या मुलगा शुभम हा दिव्यांग असून त्याला अधून मधून फिट येत असतात, असे असतानाही आणि काही वर्षापूर्वी त्यांच्या एका हुषार मुलाचे अपघाती वॉटर पार्क मध्ये निधन झाल्यावर त्यांनी धैर्य सोडले नाही. त्यांच्या मुलाच्या चांगल्या भविष्यासाठी आणि तो या आजारातून बरा होवो या इच्छेने त्यांनी ही सायकल वारी केली आहे. त्यासाठी त्यांचे पती ललित यांनी घरात थांबून मुलाची सेवा करून त्याना सहकार्य केले.

एमआयडीसी निवासी मध्ये त्यांच्या पुढाकाराने एव्हरग्रीन सायकल प्रेमी असा एक ग्रुप तयार केला असून आरोग्य व पर्यावरण राखणे हा त्यांच्या मुख्य उद्देश आहे. त्यात ते ज्येष्ठ महिला, घरकाम करणाऱ्या महिला, लहान मुले/मुली आणि विकलांग मुलांना सायकल शिकवण्याचे धडे देत असतात. अशा या धाडसी आणि सामाजिक कार्य करणाऱ्या हर्षल सरोदे या महिलेचा पद्मश्री पुरस्कार विजेते गजाननराव माने यांच्या हस्ते एमआयडीसी, मिलापनगर मधील वंदेमातरम उद्यानात करण्यात आला. यावेळी स्वरूपीणी महिला मंडळाच्या अध्यक्षा वर्षा भट, राजू नलावडे, सरोज विश्वामित्रे, राजश्री खैरे, योगिता थोटांगे, कल्पना बोंडे आदीजण उपस्थित होते.

## ठाणे महापालिका क्षेत्रात चिनी मांजा, चिनी दोरा वापरण्यास प्रतिबंध

### चिनी मांजांची विक्री होत असल्यास ८६५७८८७१०१ या टोल फ्री क्रमांकावर माहिती देण्याचे आवाहन

**ठाणे (विशाल पाटील) :** पतंग उडवण्यासाठी वापरला जाणारा प्लास्टिक किंवा सिंथेटिक पदार्थापासून तयार केलेला चिनी मांजा, चिनी दोरा किंवा नायलॉन किंवा प्लास्टिक कृत्रिम मांजा हा माणसांसाठी तसेच पक्ष्यांना घातक ठरतो. त्यामुळे या मांजांच्या वापरावर ठाणे महापालिका क्षेत्रात प्रतिबंध करण्यात आला आहे.

पतंग उडवण्यासाठी तीक्ष्ण धातू किंवा काच घटक किंवा चिकट पदार्थ तसेच धागा मजबूत करणारा पदार्थ नसलेला केवळ सुती धागा वापरण्यास परवानगी आहे. चिनी मांजा म्हणून ओळखला जाणारा हा धागा तयार करण्यासाठी बारिक चूरा केलेली काच, धातू किंवा अन्य तिक्ष्ण पदार्थांचा वापर करण्यात येतो. अशा धाग्याचे



उत्पादन, विक्री, साठवण आणि वापर यावर राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाने निर्बंध घातलेले आहेत. या धाग्याचे जैविकरित्या विघटन होत नसल्याने मल प्रणाली, जलनि:सारण बाधित होते. तसेच असे पदार्थ खाल्ल्याने जनावरांनाही इजा होते.

### दक्षता पथकांमार्फत होणार तपासणी

चिनी मांजा तथा सिंथेटिक-नायलॉन मांजाची विक्री, उत्पादन, साठवण आणि वापर टाळण्यासाठी प्रभाग समिती स्तरावर तपासणी आणि जप्ती मोहीम नियमितपणे राबविण्यात येणार आहे. त्यासाठी, प्रत्येक प्रभाग समितीत सहाय्यक आयुक्त स्तरावर कर निरिक्षक, स्वच्छता निरिक्षक, आरोग्य निरिक्षक, प्रदूषण नियंत्रण कर्मचारी यांचे दक्षता पथक तयार करण्यात आले आहे. तसेच, स्थानिक पोलिसांनाही याविषयी माहिती देण्यात आली आहे.

तक्रारीसाठी टोल फ्री क्रमांक

प्रतिबंधित सिंथेटिक, नायलॉन मांजाची विक्री, उत्पादन, साठवण, पुरवठा किंवा वापर याबाबतच्या तक्रारी करण्यासाठी ८६५७८८७१०१ हा टोल फ्री क्रमांक नागरिकांसाठी उपलब्ध करण्यात आला आहे.



अंबरनाथ कैलास नगर येथील क्लब हाऊस शेजारी अनेक नागरिक कचराकुंडी उपलब्ध नसल्याने रस्त्यावरच कचरा फेकत आहेत. तो कचरा रोजच्या रोज उचलत नसल्याने परिसरात प्रचंड दुर्गंधी पसरत असते. या कडे अंबरनाथ नगरपरिषदेच्या आरोग्य व घनकचरा व्यवस्थापन पाहणा-या अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष होताना दिसत आहे.

# सनी देओलच्या 'जाट' चित्रपटाची सोशल मीडियावर तुफान क्रेझ, युट्यूबवर टीझरचा टॉप १० मध्ये समावेश

'गदर २'च्या घवघवीत यशानंतर अभिनेता सनी देओल आपल्या अपकमिंग चित्रपटासाठी सज्ज झाला आहे. सनी देओल एका वर्षानंतरच्या मोठ्या ब्रेकनंतर प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. सनी देओल स्टारर 'जाट' (Jaat) चित्रपटाचा टीझर रिलीज झाला आहे. 'पुष्पा २'चित्रपट ज्या दिवशी थिएटरमध्ये रिलीज झाला. त्याच दिवशी सनी देओलच्या 'जाट' चित्रपटाचा टीझरही रिलीज झाला. चित्रपटाचा टीझर फक्त सोशल मीडियावरच नाही तर, थिएटरमध्ये देखील चित्रपटाचा टीझर रिलीज झाला आहे. प्रदर्शनाच्या दिवशी १२, ५०० स्क्रीन्सवर चित्रपटाचा टीझर रिलीज केला.

अभिनेता सनी देओलचा 'जाट' चित्रपट मास ॲक्शन आणि थ्रिलर चित्रपटाची निर्मिती मैथ्री मुव्ही मेकर्सने केलेली आहे. 'पुष्पा २' आणि 'जाट' या दोन्हीही चित्रपटांचे एकच निर्माते आहेत. तर 'जाट'चे दिग्दर्शन गोपिचंद मालिनेनी यांनी केले आहे. जेव्हा या चित्रपटाचा टीझर थिएटरमध्ये प्रदर्शित झाला तेव्हा प्रेक्षकांची




एनर्जी अफलातून होती. सनी देओलच्या दमदार अभिनयाने आणि थरारक ॲक्शन सीन्सला प्रेक्षकांनी जोरदार शिट्ट्या आणि टाळ्यांच्या माध्यमातून त्यांचा उत्साह आणि प्रतिसाद दाखवला. टीझरने चाहत्यांना खुर्चीला खिळवून ठेवले, यावरुन हे पुन्हा सिद्ध झाले की सनी देओल भारतीय सिनेसृष्टीतील खरा ॲक्शन हिरो आहे.

रणदीप हुड्डा, विनीत कुमार सिंह, सैयामी खेर आणि रेजिना कैसंड्रा यांसारख्या प्रतिभावान कलाकारांच्या जबरदस्त अभिनयासोबतच हा सिनेमा प्रेक्षकांना एका दमदार आणि रोमांचक कथानकाचा अनुभव देणार आहे. 'जाट' या सिनेमाची संगीताची जबाबदारी थमन एस यांनी घेतली आहे, तर सिनेमॅटोग्राफी ऋषी पंजाबी यांनी सांभाळली आहे. नवीन नूली यांनी एडिटींगचे काम अतिशय चोख केले असून, अविनाश कोला यांनी प्रोडक्शन डिझाइनची जबाबदारी यशस्वीपणे पार पाडली आहे. ॲक्शन सीनसाठी अनल अरासु, राम-लक्ष्मण आणि वेंकट यांच्या टीमने उत्कृष्ट स्टंट आणि रोमांचक ॲक्शन सिक्वेन्स तयार केले आहेत, जे प्रेक्षकांना शेवटपर्यंत खिळवून ठेवतील.

सध्या सर्वत्र सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्सवर 'जाट' चित्रपटाच्या टीझरची जोरदार चर्चा होताना दिसत आहे. सध्या युट्यूबवर चित्रपटाचा टीझर टॉप ९ मध्ये असल्याचं पाहायला मिळेल. अद्याप चित्रपटाची रिलीज जाहीर करण्यात आलेली नाही. काही मीडिया रिपोर्टनुसार, सन्नी देओलचा 'जाट' चित्रपट येत्या एप्रिल २०२५ मध्ये रिलीज होण्याची शक्यता आहे. सनी देओल 'जाट' या ॲक्शनपटाव्यतिरिक्त प्रीती झिंटासोबत 'लाहोर १९४७' आणि वरुण धवनसोबत 'बॉर्डर २' सारख्या चित्रपटांत दिसणार आहे.

# वयाच्या २३ व्या वर्षी अनुराग कश्यपची लेक अडकणार विवाहबंधनात! हळदीला सुरुवात, होणारा जावई कोण?

'गॅंग्ज ऑफ वासेपूर', 'सेक्रेड गेम' फेम दिग्दर्शक अनुराग कश्यपच्या घरी सध्या लगीनघाई सुरू झाल्याचं पाहायला मिळत आहे. अनुरागची लाडकी लेक आलिया कश्यप येत्या काही दिवसांत विवाहबंधनात अडकणार आहे. या सोहळ्याची खास झलक दिग्दर्शकाने आपल्या सोशल मीडियावर शेअर केली आहे.

अनुराग कश्यपची लेक आलिया कश्यप नेहमीच तिच्या हटके आणि बोल्ड स्टाइलमुळे चर्चेत असते. गेल्या काही दिवसांपासून आलिया कश्यप तिच्या वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत आहे. २०२३ मध्ये वयाच्या २२ व्या वर्षी आलियाने बॉयफ्रेंड शेन ग्रेगोयरशी साखरपुडा केला होता. आता साधारण वर्षभराने हे जोडपं लग्नबंधनात अडकणार आहे. आलिया आणि शेन यांचा लग्नसोहळा लवकरच पार पडणार आहे. या आधी दोघांच्या घरी लगीनघाईला



सुरुवात झालेली आहे. यांचा हळदी सोहळा नुकताच पार पडला असून याची खास झलक अनुराग कश्यपने इन्स्टाग्रामवर शेअर केली आहे. लाडक्या मैत्रिणीच्या हळदीला खुशी कपूर आणि दिग्दर्शक इम्तियाज अली यांची मुलगी इदा अली सुद्धा उपस्थित होती.

मीडिया रिपोर्ट्सनुसार, आलिया कश्यपचा विवाहसोहळा ११ डिसेंबरला मुंबई येथील महालक्ष्मी रेसकोर्समध्ये पार पडणार आहे. आता अनेकांना प्रश्न पडला असेल अनुराग कश्यपचा होणारा जावई नेमकं काय काम करतो तसेच हा शेन ग्रेगोयर नेमका आहे तरी कोण? याच्याबद्दल थोडक्यात जाणून घेऊयात...

अनुराग कश्यपचा होणारा जावई कोण आहे?

आलिया कश्यपचा होणारा नवरा शेन ग्रेगोयर आता २४ वर्षांचा असून तो अमेरिकन उद्योजक आहे. रॉकेट पॉवर्ड साउंड नावाच्या कंपनीचा तो संस्थापक आहे. ही सॉफ्टवेअर कंपनी साउंड डिझायनिंगचं काम करते. आलिया कश्यप आणि शेन लॉकडाऊनच्या काळापासून एकमेकांना डेट करत होते. यानंतर या जोडप्याने एकत्र येण्याचा निर्णय घेतला. मे २०२३ मध्ये शेनने आलियाला प्रपोज केलं होतं. यानंतर दोघांचा साखरपुडा पार पडला होता. आलिया ही सध्या २३ वर्षांची असून व्यवसायाने युट्यूब व्लॉगर आहे.

आलिया कश्यप आणि शेन

दरम्यान, आलिया आणि शेनच्या साखरपुड्याला खुशी कपूर, सुहाना खान, अगस्त्य नंदा, इब्राहिम अली खान, पलक तिवारी असे सगळे स्टारकिड्स उपस्थित होते. आता आलिया कश्यपच्या लग्नाला सुद्धा हे सगळेजण उपस्थित राहणार आहेत.

# सलमान खान आणि शाहरुख खानबरोबर एकत्र काम करण्याच्या चर्चांवर आमिर खानची प्रतिक्रिया

बॉलीवूडमध्ये एकापेक्षा एक हरहुन्नरी अभिनेते आहेत. यामध्ये बॉलीवूडच्या तिन्ही खानची कायम चर्चा होत असते. ते म्हणजे शाहरुख खान, सलमान खान आणि आमिर खान या तिन्ही कलाकारांनी आजवर सिनेसृष्टीला अनेक सुपरहिट चित्रपट दिले आहेत. तिघांचेही चित्रपट बॉक्स ऑफिसवर कायम दमदार कमाई करतात. आता हे तिन्ही अभिनेते लवकरच एका चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला येण्याची शक्यता आहे. आमिर खानने स्वत: यावर प्रतिक्रिया दिली आहे.

नुकतेच आमिर खानला 'रेड सी फिल्म फेस्टिव्हल'मध्ये सन्मानित करण्यात आले. त्यावेळी त्याला सलमान खान आणि शाहरुख खान यांच्याबरोबर काम करण्याच्या शक्यतेवर प्रश्न विचारण्यात आला. त्यावेळी आमिर खानने यावर प्रतिक्रिया दिली. "मला वाटतं सलमान खान आणि शाहरुख खान दोघांचीही यासाठी संमती आहे. त्यांचंही असं म्हणणं होतं की, आपण तिघांनी एकत्र काम केलं पाहिजे, त्यामुळे आशा आहे की हे लवकरच पूर्ण होईल", असं आमिर खानने म्हटलं आहे.

आमिरने पुढे यावर याआधी आमच्या तिघांचीही चर्चा झाली होती हेसुद्धा सांगितलं आहे. तो म्हणाला, "जवळपास सहा महिन्यांपूर्वी मी, शाहरुख आणि सलमान एका कार्यक्रमात एकत्र भेटलो होतो, त्यावेळी आम्ही यावर चर्चा केली. खरंतर मी स्वत:च हा मुद्दा सुरू केला होता. मी शाहरुख आणि सलमान



खानला म्हटलं, जर आपण तिघांनी एकत्र एका चित्रपटात काम केलं नाही तर ही खरोखर एक दु:खद बाब असेल."

आमिर खान, सलमान खान आणि शाहरुख खान या तिघांना एकत्र रुपेरी पडद्यावर पाहता यावं अशी त्यांच्या चाहत्यांचीही इच्छा आहे. आमिरने याआधी कपिल शर्मा शोमध्येही यावर प्रतिक्रिया दिली होती. "आम्ही तिघेही इतक्या वर्षांपासून बॉलीवूडमध्ये काम करत आहोत, त्यामुळे आम्ही एकाही चित्रपटात एकत्र काम न करणे हे प्रेक्षकांसाठी अन्यायकारक असेल", असं आमिर खान म्हणाला होता.

दरम्यान, या तिन्ही कलाकारांच्या कामाबद्दल बोलायचं झाल्यास, १९९४ मध्ये आलेल्या 'अंदाज अपना अपना'मध्ये सलमान खान आणि आमिर खानने एकत्र काम केलं होतं, तर शाहरुखबरोबर सलमान खाननेदेखील काही चित्रपटांत एकत्र काम केलं आहे. 'कुछ कुछ होता है', 'ट्यूबलाइट', 'झिरो', 'टाइगर ३' या आणि अन्य काही चित्रपटांत शाहरुख खान आणि सलमान खान एकत्र रुपेरी पडद्यावर झळकले आहेत.

# झोपण्यापूर्वी कोणती फळे खाऊ नये? वाचा,तज्ज्ञांचा सल्ला

आपल्या सर्वांना माहीत आहे की तज्ज्ञ झोपण्यापूर्वी जड जेवण घेण्यास का नकार देतात. अपोलो स्पेक्ट्रा हॉस्पिटल, आहारतज्ज्ञ मुंबई, डॉ. जिनल पटेल यांनी सांगितले की, यामुळे शरीरातील चयापचय मंदावते, ज्यामुळे काही जुनाट आजार होतात. "झोपण्यापूर्वी कार्बोहायड्रेटयुक्त पदार्थांचे सेवन केल्यास शरीराला हे पचण्यास कठीण जाते; परिणामी तुमचे वजन वाढू शकते आणि ॲसिडिटीचा त्रासही होऊ शकतो. काहींना ओटीपोटात दुखणे, अस्वस्थता, सतत छातीत जळजळ होऊ शकते, ज्यामुळे शेवटी गॅस्ट्रोएसोफेजल रिफ्लक्स रोग (GERD) होतो," असे ते म्हणाले.

डॉ. पटेल म्हणाले की, "जे रात्री उशिरा जेवतात त्यांना लठ्ठपणा, हृदयाच्या समस्या आणि मधुमेह होण्याची शक्यता असते. जंक फूड जास्त प्रमाणात खाणे, विशेषत: रात्री उशिरा, कोलेस्ट्रॉल आणि फॅटी डिपॉझिटमुळे रक्तवाहिन्या अरुंद आणि बंद होतात."

शारदा हॉस्पिटलच्या वरिष्ठ आहारतज्ज्ञ श्वेता जयस्वाल म्हणाल्या की, "झोपण्यापूर्वी हलकी फळे खाल्ल्याने झोपेच्या गुणवत्तेला हानी न पोहोचता रात्री उशिरापर्यंतची भूक कमी होण्यास मदत होते. फळांमध्ये नैसर्गिकरित्या कॅलरी कमी असतात. ते हायड्रेटिंगदेखील करत आहेत, जे एकंदर आरोग्यासाठी उपयुक्त आहे, जे त्यांना या



प्रसंगासाठी अगदी योग्य बनवते."

**झोपण्यापूर्वी कोणती फळे खावी?**

स्ट्रॉबेरी आणि ब्लूबेरी : यामध्ये साखरेचे प्रमाण कमी असते, अँटिऑक्सिडंट जास्त असतात आणि पचायला सोपे असतात.

चेरी : विशेषतः टार्ट चेरी, ज्यामध्ये मेलाटोनिन असते जे झोप सुधारण्यास मदत करू शकते.

किवी : व्हिटॅमिन सी आणि अँटिऑक्सिडंट्ससाठी ओळखले जाणारे, किवी चांगल्या झोपेला प्रोत्साहन देऊ शकते.

पीच आणि प्लम्स : दोन्ही कमी-कॅलरीचे पर्याय आहेत जे पोटाला जड न होता गोड खाण्याची इच्छा पूर्ण करतात.

**रात्री झोपण्यापूर्वी कोणती फळे खाऊ नये?**

**केळी** : शरीराचे तापमान आणि चयापचय वाढवू शकते, ज्यामुळे झोपेचा त्रास होऊ शकतो.

**टरबूज** : पाण्याचे प्रमाण जास्त आहे, ज्यामुळे रात्रीच्या वेळेस सतत बाथरूमला जावे लागू शकते.

**लिंबूवर्गीय फळे** : त्यांच्या आंबटपणामुळे छातीत जळजळ किंवा अपचन होऊ शकते.

**सफरचंद आणि अननस** : फायबर आणि ॲसिडिटीमुळे दोन्ही पचनसंस्थेला त्रास देऊ शकतात.

# दररोज ५ मशरूम खाल्ल्याने शरिरावर काय परिणाम होतात; फायदे ऐकून लगेच आहारात समावेश कराल

मशरुम खाणे आपल्या आरोग्यासाठी अत्यंत फायदेशीर आहे. मशरुममध्ये अत्यंत कमी कॅलरी असतात. सोबतच त्यात अनेक पोषणतत्व असतात. मशरुममध्ये मोठ्या प्रमाणात अँटीऑक्सिडंट असते. मशरुममध्ये विटामिन डीदेखील असते. हे विटामिन हाडांच्या मजबुतीसाठी आवश्यक असतं. मशरुम खाल्ल्याने २० टक्के विटामिन डीची कमतरता भरून निघते. अशातच नवीन संशोधनानुसार, दिवसातून फक्त पाच लहान मशरुम खाल्ल्याने हृदयविकार, कर्करोग आणि स्मृतिभ्रंश यांसह अनेक रोगांचा सामना करण्यास मदत होऊ शकते.

जगभरात १४ हजार वेगवेगळ्या जातींचे मशरुम आहेत, मात्र आपण ते सगळेच खाऊ शकत नाही, कारण



त्यातले काही मशरुम हे विषारीही आहेत. मशरूम फाउंडेशन ऑफ इंडियाच्या मते, मशरुममध्ये प्रथिने, कार्बोहायड्रेट आणि जीवनसत्त्वे भरपूर असतात, कॅलरी मूल्य कमी असते आणि म्हणूनच हृदय आणि मधुमेहाच्या रुग्णांसाठी शिफारस केली जाते. तृणधान्ये, फळे आणि भाज्यांच्या तुलनेत मशरुममध्ये जास्त प्रथिने असतात. मशरुम शिजवल्यानंतरही प्रथिने टिकून राहतात. मशरुममध्ये कमी उष्मांक, उच्च प्रथिने, उच्च फायबर सामग्री असल्याने ते मधुमेह आणि उच्च रक्तदाब रुग्णांसाठी फायदेशीर आहेत, असे संशोधकांचे म्हणणे आहे.

भारतात आठ सर्वात लोकप्रिय मशरुम आहेत, त्यातलाच एक लहान, बंद टोपी आणि हलके तपकिरी किंवा फिकट पांढऱ्या रंगाचा मशरुम जगभरात उगवलेला आणि वापरला जाणारा सर्वात लोकप्रिय मशरुम प्रकार आहे. यामध्ये जीवनसत्त्वे (बी जीवनसत्त्वे, व्हिटॅमिन डी), खनिजे (सेलेनियम, तांबे, पोटॅशियम) आणि अँटिऑक्सिडंट्स यांसारख्या आवश्यक पोषक तत्वांचा हा चांगला स्रोत आहे. शिताके मशरुम, कॉर्डीसेप्स मशरुम, लायन्स माने मशरुम, रेशी मशरुम, टर्की टेल मशरुम आणि चागा मशरुम या भारतात आढळणाऱ्या इतर जाती आहेत.




**मेष** – मुलांच्या जबाबदाऱ्या व्यवस्थित पार पाडाल. मान सन्मानात वाढ होईल. विचारपूर्वक पावले उचला. अडचणीतून मार्ग निघेल.

**वृषभ** -आपली जुनी कामे मार्गी लावाल. आर्थिक व्यवहारात यश येईल. जुने प्रयत्न फलद्रुप होतील. आरोग्याकडे दुर्लक्ष करू नका.

**मिथुन** - अपेक्षित व्यक्ती भेटल्यामुळे कठीण कामातील अडचणी कमी होतील. नफा वाढेल. कायदा मोडू नये. मौल्यवान वस्तू खरेदी कराल.

**कर्क** – आवडत्या व्यक्तीचा सहवास लाभेल. विरोधक माघार घेतील. चांगल्या गोष्टीसाठी खर्च कराल. प्रकृतीकडे दुर्लक्ष करू नका.

**सिंह** – धंद्यात वाढ होईल. घरगुती वातावरण आनंदी राहील. संयम बाळगून वागा. प्रवासात आनंद मिळेल. स्पर्धा आकर्षक ठरेल.

**कन्या** – संततीच्या प्रगतीने खूश व्हाल. नोकरीत वरिष्ठ कौतुक करतील. शक्यतो कोणत्याही वादात अडकू नका. धंद्यात लाभ होईल.

**तूळ** – कार्यालयीन वातावरण अनुकूल राहील. एखादा मोठा व्यवहार पार पडेल. निराशाजनक घटना दुर्लक्षित कराव्यात.

**वृश्चिक** – ठरवलेले काम वेळेत पूर्ण करू शकाल. विरोध सहन करून काम करावे लागेल. पराक्रमात वाढ होईल. मन:शांती लाभेल.

**धनु** – जीवनसाथीच्या मर्जीनुसार वागावे लागेल. स्पर्धा सरस होईल. शक्यतो मानसिक गुंतागुंतीत अडकू नका. प्रसिद्धी मिळेल.

**मकर** – कौटुंबिक तिढा सोडवाल. एखाद्या कामासाठी आपणास अधिक धावपळ करावी लागेल. आपल्या धाडसी वृत्तीचे दर्शन घडेल.

**कुंभ** - कठीण कामात प्रयत्नाने आपणास यश मिळवता येईल. जीवनातील अडचणी कमी होतील. व्यवसायात नीतीचा मार्ग अवलंबा.

**मीन** – नवीन ओळखीतून प्रतिष्ठा लाभेल. नकारात्मक घटना फार मनावर घेऊ नका. मुलांकडून शुभवार्ता मिळेल. खरेदी कराल.

# पुणेकरांचा श्वास गुदमरला



पुणे (अभिजीत येरल्लू) - पुणे शहरातील सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ चौकात सर्वात जास्त हवा प्रदूषित झाल्याचे समोर आले आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील हा चौक हा काही वर्षापासून शहरातील हवा प्रदूषणाचा टॉपचा हॉटस्पॉट झालेला आहे. कारण या चौकात सुरू असलेल्या उड्डाणपुलाच्या कामामुळे दररोज मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होते.

या ठिकाणी अति सूक्ष्म धुलिकणांचे प्रमाण ९९ मायक्रो ग्रॅम प्रति चौरस मीटर इतके वाढले आहे. हे प्रमाण ६० इतके असायला हवे मात्र ते पावणेदोन पटीने वाढल्याने नागरिकांच्या आरोग्यावर मोठा परिणाम होण्याची शक्यता आहे. पुणे शहरातील सिंहगड रस्त्यावर रेस्पायर सायन्ससेस नावाचे हवामान विषयक स्टार्टअप २०१७ पासून कार्यरत आहे. त्यांच्यासोबत गुगल मॅपने हवा प्रदूषण मोजण्यासाठी सामंजस्य करार केला आहे. यात देशातील सुमारे १५० शहरांच्या हवेच्या गुणवत्तेचा अहवाल ही संस्था दर महिन्याला देत आहे यात पुणे आणि पिंपरी चिंचवडचा समावेश आहे. दरम्यान, आज मुंबईत २०.९९ अंश सेल्सिअस किमान तापमानाची नोंद झाली. हवामान खात्याच्यामते, ढगाळ वातावरण राहण्याची शक्यता आहे. कमाल तापमान २५.७४ सेल्सिअस राहण्याता अंदाज आहे.

# अमली पदार्थांची विक्री व वाहतूक रोखण्यासाठी जिल्ह्यातील यंत्रणांनी सक्रिय सहभाग नोंदवावा - निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. संदीप माने

ठाणे (सम्यक कासारे ) :- समाजात अंमली पदार्थांचा वापर टाळण्यासाठी व युवा पिढीला अंमली पदार्थांपासून दूर ठेवण्यासाठी सर्व यंत्रणांनी सक्रिय सहभागी व्हावे. ठाणे जिल्ह्यातील रासायनिक कंपन्या, परदेशातून येणारी पार्सल, गांजाची लागवड होणारी ठिकाणी आदी ठिकाणांवर लक्ष ठेवून वारंवार तपासणी करावे, असे निर्देश निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. संदीप माने यांनी आज येथे दिले. जिल्हास्तरीय अंमली पदार्थ विरोधी कृती समितीची बैठक आज डॉ. माने यांच्या अध्यक्षतेखाली पार पाडली. यावेळी अंमली पदार्थांची



विक्री व वाहतूक रोखण्यासाठी कडक पावले उचलण्याचे निर्देश त्यांनी दिले. यावेळी ठाणे ग्रामीणचे प्रभारी पोलीस उप अधीक्षक (गृह) तथा वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रमोद बाबर, ठाणे पोलीस आयुक्तालयाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राहूल म्हस्के, मीरा भाईंदर पोलीस आयुक्तालयाचे पोलीस निरीक्षक अमर मराठे, नशाबंदी मंडळाचे रविंद्र गुरचळ यांच्यासह अन्न व औषध प्रशासन, कृषि, टपाल विभाग, औद्योगिक सुरक्षा विभाग, शिक्षण विभाग, वन विभाग व शिक्षण विभागाचे अधिकारी उपस्थित होते. ठाणे ग्रामीण पोलीसांनी सन २०२४ मध्ये सुमारे २ लाख ३७ हजार रुपये किमतीचा गांजा जप्त केला आहे. तर मीरा भाईंदर पोलीस आयुक्तालयाच्या पथकाने अंमली पदार्थांची विक्री व वाहतूक करणाऱ्यांविरुद्ध एकूण १४७ गुन्हे दाखल केले असून १७७ आरोपींना अटक केली आहे. ठाणे पोलीस आयुक्तालय व नवी मुंबई पोलीस आयुक्तालयानेही अंमली पदार्थांची विक्री व वाहतूक करणाऱ्यांविरुद्ध कडक पावले उचलली असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

## SPORT

# Jasprit Bumrah tol d he wouldn't 'last long'; India pacer makes candid admission: 'He'll play for 6-7 months'

**New Delhi** - The stocks of Jasprit Bumrah continue to rise, especially as he catches the fascination of Australian fans with fine performances in the ongoing Border-Gavaskar Trophy. Although India lost the second Test match in Adelaide, Bumrah's star turn as player of the match in Perth endeared him to the cricket-crazy fans Down Under.

Speaking to broadcasters Fox Cricket about his unique action and how he has developed into one of the finest bowlers in world cricket, Bumrah dove deep into the elements that helped him as an up-and-coming bowler in his youth. "I don't think a lot of people believed in me because they thought that this bowling action will not last for long. He'll play for six months, seven months," explained Bumrah. "So not really a lot of people worked on me or, you know, gave me inputs that, you know, I think this is useful or you should stop doing that because. I don't think they saw a lot of merit." Despite this, Bumrah took advantage of the situation to steel himself mentally



and allow his natural game to develop and speak for itself. "I think that worked out in my favour because. I was self-reliant then and I had to have a lot of self-belief and find out solutions on my own. So yes, nobody tried to change me, but nobody gave any extra solutions," said the fast bowler. "So that worked out for the best in the greater interest, but then that helped me develop, you know." Bumrah is now one of the greatest cricketers India has ever produced but he started off as an unknown entity for Mumbai Indians, who scouted him and saw his potential despite an awkward bowling motion and questions over its viability. Speaking about his unorthodox style and the reasons he needed to rely on it, Bumrah explained that getting into playing cricket late was a big element, forcing him to learn by watching. "I started my cricket quite late. I was not a tearaway quick because at six, seven, I didn't play cricket. I started cricket with the season ball probably at 16, 17." "I'd got no formal coaching ever. So I learned everything through the television and, you know, somehow picked up cues and kept on finding my own solutions," explained India's star pacer further. "So that's worked with me till date that, you know, I come into a setup. I rely on my own instincts

# Siraj, have you gone mad? Kris Srikkanth blasts India pacer for Travis Head send-off

**New Delhi** - Former India captain Kris Srikkanth lashed out at Mohammed Siraj for his expletive-laden send-off to Travis Head during the second Test of the Border-Gavaskar Trophy 2024 in Adelaide. Srikkanth said Siraj should have applauded Head for his match-winning century instead of involving in a heated exchange with the Australian batter, who scored 140 off 141 balls against the pink ball. Speaking on his YouTube show, Kris Srikkanth said Siraj should have given Head the respect he deserved after the Australian batter smashed the Indian bowlers all over the park at the Adelaide Oval. Head hit 17 boundaries and four sixes in a knock that deflated India's hopes and helped Australia seal a decisive 157-run lead in their first innings.

"He has smashed the bowling mercilessly. Hey Siraj, don't you have brains? What are you doing? Have you gone mad? He smashed you left, right and centre. He hit boundaries and sixes effortlessly in his knock of 140.



You're giving him a send-off after that. Is this called Sledging? What rubbish is this? It's just madness," an animated Srikkanth said.

"One batter has scored 140. Give him credit, and applaud his knock. Instead of saying 'brilliant knock', you're giving him a send-off? As if, you got him out on 10 or 0, as if you planned it and got his wicket! He smashed you all over. The Indian bowlers had no answers to Head's onslaught. 140 off 141 balls. Look at that. He hit sixes at will. He didn't treat Ashwin as a spinner, he is dancing down the track and smashing him," Srikkanth added.

Siraj and Head are likely to be fined and reprimanded severely for the on-field exchange in the pink-ball Test, which Australia won by 10 wickets.

It all began when Siraj gave an aggressive send-off to Head after dismissing the Australian batter on 140. Siraj was hit for a six in the previous delivery, but he bounced back with a yorker that crashed into the stumps.


Both Siraj and Head were seen exchanging expletives after the dismissal. The Adelaide crowd, which was rooting for the hometown hero, responded by booing Siraj relentlessly after the incident. Head even said Siraj misunderstood a compliment while the Indian fast bowler responded to it by accusing the Australian batter of 'lying'. However, both Siraj and Head hugged it out and buried the hatchet at the end of the Test match. Head even confirmed that the two players spoke to each other and promised to put the incident behind. Sweet with it. He came out and just said [it was] a little bit of a misunderstanding ... I think we will move on. We've had a great week, so let's not let it ruin it," Head said after winning the Player of the Match award in Adelaide. With the series tied at 1-1, India and Australia will meet in the third Test, starting December 14 in Brisbane.



## MS Dhoni Beats Amitabh Bachchan And Shah Rukh Khan To Top List Of Endorsements With 42 Brands

**New Delhi** - Legendary Indian cricketer MS Dhoni, who remains active in the sport with his beloved IPL side Chennai Super Kings, topped the list of celebrity endorsements as he plays the face of a whopping 42 brands in his diverse portfolio. The 43-year-old CSK star stands even ahead of Bollywood celebrities including the iconic Amitabh Bachchan, who has 41 deals of endorsements to his name, and Shah Rukh Khan, with 34 deals under his belt, according to a report published by TAM Media Research, a joint venture between USA's Nielsen and UK's Kantar. Dhoni most recently penned a deal with Eurogrip tyres making the wicketkeeper-batter the face of the brand. His other commitments include marquee names including Master Card, Citroen, Gulf Oil, Cleartrip, Lay's, and Garuda Aerospace among others.

# Virat Kohli should take a leaf out of Sachin Tendulkar's SCG knock: Gilchrist



**New Delhi** - Former Australia batter Ricky Ponting wants Virat Kohli to take a leaf out of Sachin Tendulkar's book. Speaking after the 2nd Test match in Adelaide where Kohli got out for 7 and 11 respectively, Gilchrist said that Virat Kohli might be better off playing the patience game. Kohli has gotten out thrice this series edging the ball behind the stumps. Speaking on Cricbuzz, Gilchrist said that Kohli should have a look at Sachin Tendulkar's knock in Sydney back in 2004, where the batter did not hit a single shot through the cover as he had been edging the ball outside off stump in the build up to that game.

"The biggest battle, is not with what's coming towards you from the bowler or the skill of the opposition, it's more about battle between your ears. So, not suggesting that Virat scrambled any sense, but maybe he's got to try and hone in on what Sachin Tendulkar did at the SCG. And say 'right he'd say, right, I'm not gonna go chase anything outside off stump. You come to me.' You just play the patience game," Adam Gilchrist said on Cricbuzz after the 2nd Test match.

"He's got enough experience under his belt to know that he's mentally tough. He's carried the weight of expectation since U-19 level, entering the IPL and becoming the icon that is. He should be able to say to himself, I'm going to do what's within my capacity to do the best thing for the team and if it's a long patient game, so be it. If you play long enough, you're probably gonna have to evolve with different ways and this might be an opportunity for Virat to do that," he further added.

**SACHIN TENDULKAR'S SCG KNOCK**

Sachin Tendulkar's unbeaten 241 against Australia at the Sydney Cricket Ground (SCG) during the 2003-04 Test series is one of the most memorable and strategically brilliant innings in cricket history. This knock was significant not only for its volume of runs but also for the extraordinary discipline and control Tendulkar exhibited. Prior to this match, Tendulkar had been struggling with his form, particularly against deliveries pitched outside the off stump. He had been dismissed repeatedly while attempting his trademark cover drive, a shot that had been a cornerstone of his batting but had become his downfall in the series. Determined to turn things around, Tendulkar made a bold and pragmatic decision: he chose to refrain from playing a single cover drive throughout the innings. This strategy was both daring and effective. By avoiding his natural instinct to play the cover drive, Tendulkar nullified the Australian bowlers' primary plan to dismiss him. The Australian attack, which included formidable bowlers like Brett Lee, Jason Gillespie, and Nathan Bracken, had been exploiting Tendulkar's weakness outside the off stump, but his new approach denied them this avenue.

# जिल्हास्तरीय शालेय आट्यापाट्या स्पर्धेत सिध्दार्थ विद्या मंदिरचे यश



● कल्याण, गणेश बागडे :

कल्याण डोंबिवली महानगरपालिका जिल्हास्तरीय आट्यापाट्या स्पर्धेत सिद्धार्थ विद्या मंदिर, कल्याण पूर्वच्या शाळेचा १४ वर्षाखालील आट्यापाट्या मुलांचा संघ विजेता ठरला. कल्याण डोंबिवली महानगरपालिका जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धा २०२४-२५ अंतर्गत जिल्हास्तरीय आट्यापाट्या स्पर्धा रविवारी बी के बिर्ला महाविद्यालय, कल्याण पश्चिम या ठिकाणी पार पडल्या. या स्पर्धेत सिद्धार्थ विद्या मंदिर शाळेतील माध्यमिक विभागाच्या १४ वर्षाखालील मुलांचा संघ विजेता ठरला असून विभागीय स्पर्धेसाठी पात्र झाला आहे. हा संघ १८ डिसेंबर रोजी पार पडणाऱ्या मुंबई विभागीय स्पर्धेसाठी कल्याण डोंबिवली महापालिकेचे प्रतिनिधित्व करणार आहे. संस्था पदाधिकारी, मुख्याध्यापिका ज्योत्स्ना चाळसे व सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व पालक यांनी विजयी संघाचे, संघ व्यवस्थापक दिलीप गायकर, प्रविण खाडे, संघाचा मार्गदर्शक व शाळेचा माजी विद्यार्थी सुशांत सोनवणे व शुभम गराडे यांचे विशेष अभिनंदन करुन विभागीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# लाडकी बहीण योजनेच्या अर्जांची खरंच छाननी होणार का?



● मुंबई, विशाल कारंडे :

राज्यात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना नव्याने चर्चेत आली आहे. विधानसभा निवडणुकीच्या काळात याच योजनेला केंद्रस्थानी ठेवून महायुतीने आपला प्रचार केला होता. मात्र आता या योजनेतील लाभार्थी महिलांच्या तक्रार आलेल्या अर्जांची छाननी केली जाणार असल्याचे सांगितले जात आहे. या वृत्तानंतर राजकीय वर्तुळातून तसेच राज्यभरातून वेगवेगळया प्रतिक्रिया उमटत आहेत. असे असतानाच आता नवी आणि ठोस माहिती समोर आली आहे. लाभार्थी महिलांच्या अर्जांची छाननी पुन्हा होणार नाही, असे राज्याच्या माजी महिला व बालकल्याण विभागाच्या मंत्री आदिती तटकरे यांनी दिली आहे.

आदिती तटकरे यांनी एबीपी माझाशी बातचित केली. यावेळी बोलताना "लाडकी बहीण योजने जवळपास दोन कोटी ३४ लाखाच्या जवळपास महिला लाभार्थी आहेत. लाभार्थ्यांची

## आदिती तटकरे यांनी संभ्रम संपवला

कोणत्याही प्रकारची स्क्रुटनी होणार नाही. छाननीबाबत चुकीचे वृत्त समोर येत आहे. या योजनेचे जे लाभार्थी आहेत त्यांना योग्य पद्धतीने लाभ मिळालेला आहे. या योजनेच्या काही लाभार्थी महिलांच्या अर्जांबाबत काही तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. या तक्रारींबाबतसंबंधित विभाग निर्णय घेईल. पण सध्यातरी अर्जांच्या छाननीबाबत कोणताही निर्णय झालेला नाही. सध्या मी त्या विभागाची मंत्री नाही. मात्र मी जेव्हा मंत्री होते, त्यावेळी असा कुठलाही निर्णय घेतलेला नाही. जे लाभार्थी आहेत, त्यांना योग्य पद्धतीने पैसे देताना याआधीच अर्जांची छाननी करण्यात आलेली आहे, अशी माहिती आदिती तटकरे यांनी दिली.

लाडकी बहीण योजनेअंतर्गत काही महिलांना निकषात बसत नसूनही प्रतिमहिना १५०० रुपये लाभ दिला जात आहे, अशा तक्रारी आल्या होत्या. त्यामुळे तक्रार आलेल्या अर्जांची नव्याने छाननी केली जाणार आहे. तसेच अर्जामध्ये तफावत आढळल्यास, चुकीची माहिती दिली गेली असल्यास अर्ज बाद केला जाईल, असे सांगण्यात येत आहे. यासह अर्जदार महिला सरकारने घालून दिलेल्या नियमांत बसत नसेल, तरीदेखील अर्ज बाद केला जाईल, असे सांगितल जात आहे. पण अद्याप तसा कोणताही निर्णय घेण्यात आलेला नाही, असे आदिती तकटकरे यांनी सांगितले आहे. दरम्यान, देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतल्यानंतर अर्जांची छाननी करण्याचे सूतोवाच केले होते. तसेच या योजनेअंतर्गत मिळणारा लाभ १५०० रुपयांवरून २१०० रुपये केला जाईल, अशी माहितीही फडणवीस यांनी दिली होती. सर्व बाबी तपासून आगामी अर्थसंकल्पात त्यासाठीच्या निधीची तरतूद करण्यावर विचार केला जाईल, असे फडणवीस यांनी सांगितले होते.

# तुम्ही पुन्हा येईल म्हणाले नाहीत, तरी आलात

## फडणवीसांनी नार्वेकरांचं असं केलं कौतुक



● मुंबई, यश सावंत :

अध्यक्ष महोदय, "मी पुन्हा येईल" असं तुम्ही म्हणाला नव्हता. तरी तुम्ही परत आलात त्याबद्दल तुमचे अभिनंदन. तुम्ही खुर्चीला न्याय देण्याचे काम कराल. नाना भाऊ (नाना पटोले यांना उद्देशून) तुम्ही वाट मोकळी केलीत म्हणून नार्वेकरांना संधी मिळाली, असा खोचक टोला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेतील भाषणादरम्यान लगावला.राहुल नार्वेकर यांची पुन्हा विधानसभा अध्यक्ष म्हणून एकमताने निवड झाली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांच्या नावाचा प्रस्ताव ठेवला होता. त्याला एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी सहमती दिली. यावेळी बोलताना देवेंद्र फडणवीस यांनी राहुल नार्वेकर यांचे फेरनिवडीबद्दल अनुमोदन दिलं. त्याशिवाय विरोधी पक्षाचे आणि गटनेत्यांचे आभार व्यक्त केले. यावेळी बोलताना देवेंद्र फडणवीस यांनी सरकारने केलेले आधीचे काम आणि पुढची दिशा कशी असेल, याबाबत वक्तव्य केले.

पाच वर्षांच्या या संक्रमण काळात मीडियाचे तुमच्याकडे लक्ष होतं. नार्वेकर अभ्यासू आणि संयमी व्यक्तिमत्त्व आहे. मुंबई कोकणात अनेक दिग्गजांनी जन्म घेतला. सलग दुसऱ्यांदा अध्यक्ष होण्याचा मान फक्त 4 लोकांनाच मिळाला आहे. त्यात आपण गणले जाणार आहात. सभागृहाचे काम आणि नियम यांचा अध्यक्षांचा चांगला अभ्यास आहे, असे कौतुक यावेळी देवेंद्र फडणवीस यांनी नार्वेकरांचे केले. सभागृहाच्या दालनांचा चेहरा अध्यक्षांनी बदलला. कितीही गरम चर्चा झाली तरी त्यांच्या दालनातील कॉफीने वाद संपतात. ते डावीकडील आणि उजवीकडील आवाज ऐकतात. त्यांना डावीकडील आवाज सूक्ष्मपणे ऐकावा लागेल. (विरोधी पक्षाच्या संखखेवर फडणवीसांचा टोला) आम्ही विरोधी पक्षाचा आवाज ऐकू. ज्या कुलाबा मतदारसंघात विधानसभा आहेत, त्याचे आमदारही आपण आहात, आम्ही सर्व आपल्या मतदारसंघात असल्याने आमची विशेष काळजी घेण्याची जबाबदारी आपल्यावर आहे, अशी जाणीव देवेंद्र फडणवीस यांनी नार्वेकरांना करून दिली.

# नागपूर रेल्वेस्थानकावर अनधिकृत खाद्यपदार्थ विकाल तर होईल कारवाई

● नागपूर, नितीन देवळेकर :



मध्य रेल्वेच्यानागपूर विभागात ठिकठिकाणी छापे मारून तपास पथकाने अनधिकृत खाद्यपदार्थ तसेच पिण्याच्या बॉटल विकणाऱ्यांवर कारवाई केली. दोन दिवसांत २३ जणांना अटक करण्यात आली असून, त्यांच्याकडून खाण्यापिण्याच्या चिजवस्तू जप्त करण्यात आल्या. आरोग्यास अपायकारक असलेल्या खाण्यापिण्याच्या चिजवस्तू रेल्वे स्थानक अथवा रेल्वे गाड्यांमध्ये विकल्या जाऊ नये यासाठी मध्य रेल्वेच्या नागपूर विभागाकडून विशेष लक्ष दिले जात आहे. वरिष्ठ वाणिज्य व्यवस्थापक अमन मित्तल यांनी संबंधित अधिकाऱ्यांना त्यासंबंधाने कडक उपाययोजना करण्याचे निर्देश दिलेले आहेत. असे असूनही कारवाईसाठी चालढकल होत असल्याचे पाहून अनधिकृत खाद्यपदार्थ तसेच पेय विकणारी मंडळी ठिकठिकाणची रेल्वेस्थानक आणि गाड्यांमध्ये आरडाओरड करतात. त्यामुळे अशांवर कारवाई करण्यासाठी मित्तल यांनी सात वेगवेगळी पथके तयार करून त्यांना विशेष मोहीम राबविण्याचे आदेश दिले. त्यानुसार, या पथकांनी नागपूर रेल्वेस्थानक, बल्लारशाह रेल्वे स्थानक तसेच नागपूर-वर्धा, नागपूर-इटारसी विभाग तसेच नागपूर-सेवाग्राम-बल्लारशा मार्गावर ठिकठिकाणी शुक्रवारपासून छापे मारले. यात नागपूर स्थानकावर १२ विक्रेते अवैधपणे खाण्यापिण्याच्या वस्तू विकताना आढळले. त्यांना अटक करण्यात आली. नागपूर-वर्धा आणि नागपूर-इटारसी मार्गावर ५ तर, बल्लारशाह स्थानकावर २ अनधिकृत विक्रेत्यांना पकडण्यात आले.

# 'मॅट'च्या ३३ वर्षात प्रथमच लोक अदालतीचे आयोजन



● मुंबई, विशाल पाटील :

महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाच्या (मॅट) इतिहासात ३३ वर्षात प्रथमच लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले होते. या लोक अदालतीत ५४२ सेवा विषयक प्रकरणांपैकी १३८ प्रकरणे निकाली काढण्यात आली.

न्यायाधिकरणाच्या अध्यक्ष न्यायमूर्ती मृदुला भाटकर यांच्या मार्गदर्शनाखाली हा अभिनव उपक्रम यशस्वी करण्यात आला. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण आणि मुंबई उच्च न्यायालय विधी सेवा समिती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित लोक अदालतीसाठी तीन पॅनल आयोजित करण्यात आले होते. पॅनल प्रमुख म्हणून न्यायमूर्ती विनय जोशी, सेवानिवृत्त सदस्य (न्या) ए. पी. कुन्हेकर, आर. बी. मलिक यांनी काम पाहिले. नितिन गद्रे (नागपूर), विजयकुमार (औरंगाबाद), विजया चौहान, संदेश तडवी, आर. एम. कोलगे आणि एम.बी. कदम यांनी सदस्य म्हणून काम पाहिले. अदालतीत बरीच वर्षे प्रलंबित असलेल्या प्रकरणांची मुख्य सादरकर्ता अधिकारी स्वाती मणचेकर यांनी तपासणी केली.

## तीन प्रकरणांमध्ये १२६ अर्जदारांना शासकीय नोकरी

■ लोक अदालतीत तीन प्रकरणात तडजोड झाल्याने १२६ अर्जदारांना शासकीय नोकरी मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. जलसंधारण विभागाच्या १७१ आणि कृषि विभागाच्या २१८ जागा माजी सैनिकांसाठी आरक्षित होत्या. यामध्ये सर्व जागांसाठी माजी सैनिक उमेदवार मिळू शकले नाही. त्यामुळे लोक अदालतीत तडजोडीनंतर उर्वरीत रिक्त जागा इतर उमेदवारांना उपलब्ध करुन देण्यात आल्या. या निर्णयामुळे १२६ उमेदवारांना शासकीय नोकरी मिळू शकणार आहे. या निर्णयामुळे माजी सैनिकांवर कोणत्याही प्रकारचा अन्याय होणार नाही.

■ लोक अदालत यशस्वी करण्यासाठी मुख्य सचिव सुजाता सौनिक यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व विभागातील सचिव यांच्यासह न्यायाधिकरणामधील सर्व अधिकारी, कर्मचारी, मुख्य सादरकर्ता अधिकारी, न्यायाधिकरण बार असोसिएशनमधील सर्व वकील, शासनाचे सर्व नोडल अधिकारी यांनी सहकार्य केले.

# शरीरावरील जन्मजात डागामुळे देशसेवेचे स्वप्न भंगणार का?



## केंद्रीय गृह विभागाला नोटीस

■ या प्रकरणावर न्यायमूर्तीद्वय नितीन सांबरे व वृषाली जोशी यांच्यासमक्ष सुनावणी झाली. त्यानंतर न्यायालयाने प्राथमिक बाबी लक्षात घेता केंद्रीय गृह विभागाचे सचिव, केंद्रीय राखीव पोलिस बलाचे महासंचालक, नागपूर केंद्राचे उप-पोलिस महानिरीक्षक व अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्था यांना नोटीस बजावून येत्या ५ फेब्रुवारीपर्यंत स्वत:ची बाजू स्पष्ट करण्याचे निर्देश दिले. तसेच, अंतरिम आदेश देण्याकरिता याचिकेवर १२ डिसेंबरला सुनावणी निश्चित केली.

● नागपूर, नितीन देवळेकर :

बुलडाणा जिल्ह्यातील एका शेतकरीपुत्राने मुंबई उच्च न्यायालयाच्यानागपूर खंडपीठात धाव घेऊन शरीरावरील जन्मजात डागामुळे देशसेवेचे स्वप्न भंगणार का? असा सवाल उपस्थित केला आहे. या शेतकरीपुत्राला केंद्रीय राखीव पोलिस बलाच्या नोकरीकरिता अपात्र ठरविण्यात आले आहे. सिद्धांत तायडे, असे शेतकरीपुत्राचे नाव असून, तो खामगाव येथील रहिवासी आहे. त्याच्या पायावर जन्मजात पांढरा चट्टा आहे. त्यामुळे त्याला २६ ऑक्टोबर २०२४ रोजी अपात्र ठरविण्यात आले आहे. २४ नोव्हेंबर २०२३ रोजी प्रकाशित जाहिरातीनुसार सिद्धांतने सीआरपीएफ कॉन्स्टेबल पदाकरिता अनुसूचित जाती प्रवर्गातून अर्ज केला होता. त्यानंतर त्याने लेखी परीक्षा उत्तीर्ण केली व शारीरिक चाचणीतही त्याला पात्र ठरविण्यात आले. परंतु, अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्थेचा वैद्यकीय तपासणी अहवाल त्याच्या स्वप्नाआड आला आहे. त्यावर सिद्धांतचा आक्षेप आहे. ॲड. स्वप्निल वानखेडे यांनी न्यायालयासमक्ष सिद्धांतची बाजू मांडताना अपात्रतेचा वादग्रस्त आदेश अवैधच आहे, असा दावा केला. 'अशोक दुखिया' प्रकरणात राजस्थान उच्च न्यायालयाने शरीरावरील जन्मजात डागामुळे उमेदवाराला सशस्त्र दलाच्या नोकरीकरिता अपात्र ठरविले जाऊ शकत नाही, असा निर्णय दिला आहे.

# वारणा नदीपात्रात मळीमिश्रित पाणी, मगरीसह हजारो माशांचा मृत्यू



● सांगली, राकेश गायकवाड :

दुधगाव (ता. मिरज) येथे वारणा नदीमध्ये मळीयुक्त पाणी येत आहे. त्यामुळे हजारो मृत मासे पाण्यावर तरंगत आहेत. नदीचीपाणीपातळी वाढताच मळीमिश्रित पाणी त्यामध्ये सोडल्याने पाणी दूषित झालेले आहे. नदीकाठावर सर्वत्र फेस जमा झाला आहे. गेल्या दोन दिवसांपासून मृत मासे दिसत असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले.

मळीमिश्रीत पाण्यामुळे पाणी दूषित झाल्याने प्राणवायूचे प्रमाण कमी होऊन मासे मृत्युमुखी पडत आहेत. दूषित पाण्यामुळे शिगाव, खोची, दूधगाव, कवठेपिरान, आदी अनेक गावांतील लोकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. दरवर्षी वारणा नदीला पहिले पाणी आले की, मळीमिश्रित पाणी नदीत सोडले जाते. शनिवारी पुन्हा पाणी सोडल्याने दुधगावजवळ मृत माशांचा खच पडल्याचे निदर्शनास आले. यामुळे प्रदूषणाचा मुद्दा पुन्हा गांभीर्याने पुढे आला आहे. पाणी दूषित करणाऱ्यांवर कठोर कारवाईची मागणी ग्रामस्थांतून होत आहे. वारणा नदीचे पाणी दूषित झाल्याने मगरीच्या पिलाचाही मृत्यू झाला. रविवारी सकाळी मगरीचा मृतदेह नदीतून वाहत आल्याचे ग्रामस्थांना आढळले. त्यांनी वन विभागाला याबाबत माहिती दिली. मात्र, सायंकाळपर्यंत मृत मगर नदीपात्रातच तरंगत होती. पाण्याला काळा रंग आला असून दुर्गंधीही पसरलेली आहे.

# शेततळे बनताहेत मृत्यूचे सापळे, कृषी विभागाकडून उपाययोजना आवश्यक



● सांगली, दिगंबर जाधव:

पावसाचे पाणी साठवून ठेवण्यासाठी बनवण्यात येणारे शेततळे सुरक्षेच्या उपायाअभावी धोकादायक ठरत आहेत. लोणारवाडी (ता. कवठेमहांकाळ) येथे दोन दिवसांपूर्वी दोघा चिमुरड्यांचा शेततळ्यात बुडून मृत्यू झाला. त्यामुळे पुन्हा एकदा शेततळ्यांची सुरक्षितता चव्हाट्यावर आली आहे. जिल्ह्यात दरवर्षी शेततळ्यात बुडून मृत्युमुखी पडण्याच्या दुर्घटना घडत आहेत. कृषी विभागाने 'मागेल त्याला शेततळे' देताना सुरक्षेच्या उपाययोजनांची खात्री करणे आवश्यक बनले आहे. पावसाचे पाणी साठवून ठेवून आपत्कालीन परिस्थितीत ते पिकाला देता यावे, यासाठी शेततळ्यांची संकल्पना राबवली जाते.

शेततळ्यातून आवश्यक त्यावेळी पिकांना पाणी देता आल्यामुळे अनेकांना ती वरदान ठरली आहेत. परंतु सुरक्षेअभावी शेततळे म्हणजे मृत्यूचे सापळे बनल्याचे दिसून येत आहे. प्रत्येक वर्षी शेततळ्यात बुडून चिमुरड्यांचा दुर्दैवी अंत होत आहे. पट्टीचे पोहणारेदेखील शेततळ्यात पडल्यानंतर बुडून मृत झाल्याच्या घटना घडल्या आहेत. यंदाच्या वर्षात जोंधळखिंडी येथे निवृत्त शिक्षकाचा शेततळ्यात बुडून मृत्यू झाला. मे महिन्यात नेहरूनगर येथे सुटीला आलेल्या दोघा भावांचा मृत्यू झाला.

## जिल्ह्यात साडेचार हजार शेततळी

■ 'मागेल त्याला शेततळे' योजनेतून जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात शेततळी बनवण्यात आली आहेत. सद्य:स्थितीत साडेचार हजारहून अधिक शेततळी आहेत. परंतु यापैकी बरीच शेततळी कुंपणाविना आहेत. तेथे दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

## तर दुर्घटना टळतील

■ शेततळ्यांना कुंपण घातल्यास लहान मुलांना सहजपणे आतमध्ये जाता येणार नाही.

■ शेततळ्यात पडल्यानंतर वरती येताना काठ निसरडे असल्यामुळे घसरल्यासारखे होते. त्यामुळे दोरीच्या शिड्या किंवा जाड दोऱ्या जागोजागी टाकून ठेवाव्यात.

■ पाण्यात सतत ठेवल्यानंतरही खराब न होणारे 'फ्लोटर', इनर, थर्माकोल टाकून ठेवावेत.

■ शेततळ्याभोवती सावधानतेचा इशारा देणारे फलक लावावेत.

■ शेततळ्यावर शक्य असल्यास जाळी टाकावी. त्यामुळे कचरा साचला जाईल. जाळी पाहून कोणी उतरणार नाही.